म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६९८
सन १९२८

REFBK-0003449
REFBK-0003449

का. ०५ ३९९
ना. ८६३
आ. के.

# तांबे यांची कविता

[ भाग २ रा ]

संग्राहक

## दिनकर गंगाधर केळकर

REFBK-0003449

१९२७

किमत १ रुपया

प्रकाशक
दिनकर गंगाधर केळकर,
६८३ सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.



रावसाहेब लक्ष्मणरावजी मुळ्ये

# अर्पणपत्रिका

माझ्या कवितांचा हा दुसरा भाग

माझे मित्र

रावसाहेब

**लक्ष्मणरावजी मुळ्ये**

बी. ए.

एज्युकेशन मेंबर, ग्वाल्हेर

यांस सप्रेम अर्पण केला आहे.

—भा. रा. तांबे

# प्रस्तावना

कोणत्याही प्रस्तावनेचा प्रकार व उद्देश ग्रंथपरिचय करून देण्याचाच असतो, तथापि तिच्या मुळाशीं असणाऱ्या भावना निरनिराळ्या प्रकारच्या असूं शकतात. समजा कीं, एखाद्या प्राचीन किंवा जुन्या पिढीच्या सर्वमान्य ग्रंथाला काव्याला किंवा लेखसंग्रहाला आपण प्रस्तावना लिहीत असलों तर आपली भावना कशी असते ? मला वाटतें, ती कृतज्ञतेची व अत्यंत आदराची असते. श्राद्धकर्मांतील पितृपिंडांपुढें आपल्या परिवारासह साष्टांग प्रणिपात करणाऱ्या यजमानाप्रमाणें, प्रस्तावनालेखक हा स्वतः नव्या पिढीच्या वाचकांसह, प्रस्तावनेच्या रूपानें, नमस्कार घालून ग्रंथकारांच्या गोत्रवृद्धीचा आशीर्वाद मूळ ग्रंथकाराकडून कृपाप्रसाद म्हणून मागत असतो. उलट एकाद्या तरुण होतकरू ग्रंथकाराच्या अभिनव कृतीला प्रस्तावना लिहिणाराच्या मनांत केवळ वात्सल्याची भावना असते. आपले किंवा आपल्या इष्टमित्राचें एखादें गोजिरवाणें आनंददायक बालक हातांत धरून तें जेव्हां कौतुकानें आपण पाहुण्यापुढें उभें करून दाखवितों तेव्हां जी आपली भावना असते तीच वरील प्रकारची प्रस्तावना लिहितांना तुमची आमची असत नाहीं काय ?

पण समकालीन समवयस्क व समव्यवसायी अशा ग्रंथकाराच्या ग्रंथाला प्रस्तावना लिहितांना मनांत येणारी भावना आदर-

बुद्धीप्रमाणें विनयभरित किंवा वात्सल्याप्रमाणें श्रेष्ठ भाव विशिष्ट असत नाहीं. तर या तिसऱ्या प्रकारांत बंधुभावनाच मुख्य असते. एका भावंडानें दुसऱ्या भावंडाची ओळख करून देतांना त्याच्या मनांत जें बरोबरीचें नातें आणि ममत्व असतें तेंच प्रस्तुत श्री० तांबे यांच्या या कविताग्रंथाला प्रस्तावना लिहितांना माझेही मनांत आहे येवढें सांगितलें असतां पुरे होईल. तांबे यांच्या कवितांचा पहिला भाग प्रसिद्ध झाला त्याच वेळीं त्याला प्रस्तावना लिहिण्याविषयीं प्रो० मायदेव यांनीं मला विचारलें होतें व मींही होय म्हटलें होतें. पण माझ्या इतर व्यवसायांच्या गर्दीमुळें तो योग आला नाहीं व 'तुम्ही मजकरितां ग्रंथप्रकाशनाला विलंब करूं नका' असें मायदेव यांना मींच सांगितलें. त्यानंतर एका वर्षापूर्वीं श्री० तांबे यांनीं माझ्या भेटीला येण्याची कृपा केली व स्वतः त्यांच्या तोंडून त्यांच्या कांहीं कविता ऐकण्याचा आनंद मला लाभला तेव्हां प्रस्तुत कवि व त्यांची कविता यांचा व माझा परिचय अधिक दृढ झाला. म्हणून हा दुसरा भाग प्रसिद्ध होण्याच्या वेळीं 'अज्ञातवासी' यांनीं प्रस्तावना लिहिण्याविषयीं फिरून मला विचारलें, तेव्हां ती गोष्ट मीं आनंदानें मान्य केली व ती पार पाडण्याकरितां हे दोन शब्द लिहीत आहें. पूर्वींच्या भागाला प्रस्तावना लिहितांना प्रो० पटवर्धन यांनीं अशी कल्पना केली आहे कीं, तांबे यांची कविता ही नववधूप्रमाणें सासरीं जावयास निघालेली असून स्वतः त्यांची प्रस्तावना ही तिची पाठराखणी होय. पण वधू गुणवती

असल्याशिवाय कोणचहि पाठराखणी तिची पाठ राखून किती राखणार ? त्यांतूनही तांबे यांची कविता-वधू त्याच वेळींही इतकी प्रौढ व सासरच्या माणसांच्या इतक्या पूर्व परिचयाची होती कीं, मला वाटतें सुनेनें गृहप्रवेश करितांच सदर गांठली असेल, व पाठराखणीला काम नसल्यानें तिला दळणाकांडणाच्या सोप्यांत डाळ तांदूळ निवडीत बसावें लागलें असेल. प्रस्तुत प्रस्तावना लिहितांना मीं तांब्यांच्या कवितेशीं बंधूचें नातें लाविल्यानें तिच्याबरोबर माझाही सदरेवर प्रवेश होऊन व्याही-पणाच्या मानाचा पानविडा मिळण्याची आशा मला बाळगतां येईल. मात्र समारंभाच्या महत्त्वाला अनुसरून या नववधु-कडेच सदरेवरील सर्व सभेचें लक्ष जाईल आणि तिचें कौतुक झालेलें पाहण्याचा आनंद मात्र मला मिळेल अशी मला खात्री वाटते.

प्रस्तुत कवींचें जीवनवृत्त व त्याच्या कवितांचे मुख्य गुणधर्म व मर्म या दोनही गोष्टींचें ज्ञान प्रो० मायदेव यांनीं पहिल्या भागाच्या प्रारंभीं वाचकांस करून दिलें आहे. मायदेव हे शिष्य व तांबे हे त्यांचे गुरु असें त्यांचें नातें असल्यामुळें मायदेव यांनीं तांबे यांची कविता एकत्र करून छापण्याचा उद्योग केला तो फार स्तुत्य असून प्रो० पटवर्धन यांनीं आपल्या प्रस्तावनेंत मायदेव यांना कवितेचे छोटे 'काका' असें म्हटलें आहे तें खरो-खरच योग्य आहे. तांब्यांची कविता प्रसिद्ध असली तरी तिला संग्रहाचें स्वरूप देण्याचे कामीं मायदेव यांनीं आपलेपणानें

किती खटपट केली हें मला माहीत आहे. आणि ही गोष्ट मायदेव यांच्या अंगीं गुरुभक्तीप्रमाणें स्वयंभू रसिकता व सहृदयता आहे म्हणूनच घडली एरवीं ती घडती ना.

मायदेव यांनीं पहिल्या भागाला लिहिलेल्या आपल्या प्रस्तावनेंत तांबे यांच्या कवितेच्या अंतरंगांत शिरून जें विवेचन केलें आहे त्याहून मला अधिक कांहीं लिहितां येईल असें मुळींच वाटत नाहीं. माझ्या दृष्टीनें तांबे यांच्या कवितेंत प्रेमळपणा तर आहेच परंतु त्याच्याच बरोबरीनें तत्त्वसंशोधनाची जिज्ञासाही आहे. तत्त्ववेत्ता हें संशोधन नीरस अशा कार्यकारणसंबंधाच्या चर्चेनें करतो; आणि कवि तेंच कार्य मनांत एकदम स्फुरणाऱ्या सत्यतत्त्वाला काव्यवाणीच्या अल्लड उद्गारांनीं प्रगट स्वरूप देऊन करितो. तांबे यांच्या कवितेवर तत्त्वज्ञानाची झांक असली तरी स्वतंत्र प्रतिभेची झांक त्याहूनही अधिक तजेलदार आहे. शब्द तर खरोखरच फार वेचक व विषयवर्णनाला उचित असेच पडतात. कृत्रिमपणा असा कोठेंही दिसत नाहीं. शब्दांचा कानांवर पडणारा आवाज आणि मनाला वेधणारा त्यांचा अर्थ यांची सांगड त्यांनीं घातलेली अनेक ठिकाणीं दाखवितां येईल. पृष्ठ २४: यावरील 'रुद्रास आवाहन' हें त्यांतल्या त्यांत नांव घेऊन सांगण्यासारखें उदाहरण आहे. कित्येक कवितांतून गूढ विवेचन असल्यासारखें भासतें. पण अतींद्रिय गोष्टींचें आकलन मनानें करून तें प्रगट करितांना अनियमबद्ध अशी धडपड करावी लागते, आणि उद्गार अपुरे

पडून प्रत्यक्ष दिसतें त्यापेक्षां कल्पनेनें ओळखण्यासारखें अधिक आहे (अर्थात् मनुष्यशक्ति अपूर्ण व दुर्बल होय) अशी कबुली कवीलाही द्यावी लागते, त्यामुळेंच अशा कवितांना शून्यसंशोधनाचें स्वरूप येतें. पण या शून्यसंशोधनांतही गूढ अशा गोष्टी कवीला खरोखरच कांहीं दिसतात कीं नाहीं, किंवा शून्यसंशोधनाचा बहाणा करून कवि उगीच कांहीं वायफळ बडबड करीत आहे कीं काय, हें चाणाक्ष वाचकाला तेव्हांच उमगतें. पिंपळाच्या पानाला तेल व काजळ लावून करपुतळीचा खेळ करणारा तेंच पान अनेकांच्या हातीं देतो. अर्थात् आंत पाहून जें 'दिसतें' तें त्या पानांत असत नाहीं तर पाहणारा स्वतः आपल्या अंतर्ज्ञानांतूनच तें काढीत असतो. असें असतांही एखादा करपुतळींतील चमत्कारांचें सुसंबद्ध व सुरस असें वर्णन करतो, आणि दुसरा कुत्र्याचे पाय मांजराला लावून कांहीं तरी असंबद्ध असें बडबडतो हा अनुभव सर्वांनाच आहे.

तांबे यांची बरीचशी कविता गातां येण्यासारखी आहे. चांगला गवई कांहींही गाऊन दाखवूं शकतो हें वेगळें. तथापि त्यांतल्या त्यांत शब्द यमक व विराम यांची अनुकूलता प्रतिकूलता यांमुळें गाण्यांत फरक पडणारच. त्या दृष्टीनें पाहतां तांबे यांची कविता गवयाला अधिक सोपी जाईल असें वाटतें. अशी कविता पहिल्या भागापेक्षांही दुसऱ्या भागांत अधिक आहे. कवितेच्या शिरोभागीं असुक एक राग लिहिला म्हणजे ती त्याच रागांत गाइली पाहिजे असा निर्बंध नसतो. तथापि या भागांत बहुधा

प्रत्येक कवितेवर रागाच्या नांवाचा निर्देश केलेला आहे आणि स्वतः हा कवि, त्याचा गळा विशेष गोड नसला तरी, राग-दारीच्या चाली शुद्ध स्वरूपांत म्हणून दाखवूं शकतो हें मीं पाहिलें आहे. म्हणून त्या त्या कविता त्या त्याच रागांत म्हटल्या गेल्यास कवीच्या अंतरंगांतील भावना-चित्र अधिकांत अधिक यथार्थतेनें प्रगट होईल असें वाटतें. असो. प्रस्तावने-दाखल हे अपुरेच पण मनाला पटलेले दोन शब्द लिहून, आणि साहित्यसंमेलनाच्या प्रसंगीं तांबे यांच्या कवितेचा दुसरा खंड प्रसिद्ध करण्याचा योग श्री० 'अज्ञातवासी' यांनीं घडवून आणला याबद्दल त्यांचें अभिनंदन करून पुरें करतों.

पुणें,<br>ता. १९-५-२७

न. चिं. केळकर.

# संग्राहकाचे चार शब्द

श्री० भास्करराव तांबे यांचा सुंदर कवितासंग्रह प्रसिद्ध होऊन उणींपुरीं ७ वर्षें झालीं. या काळांत त्यांच्या काव्य-पुष्पांनीं चांगलाच नांवलौकिक मिळविला व त्या कवितांचे गुणग्राही संग्राहक प्रो० मायदेव यांच्या परिश्रमाचें चीज झालें. पहिल्या भागानंतर लिहिलेल्या कवनांचा संग्रह करण्याचा मान ओघानें प्रो० मायदेव यांचाच आहे; पण त्यांनीं या वेळीं मला संधि दिली हें मित्रप्रेमाला योग्य असेंच त्यांनीं केलें.

कविवर्य भास्करराव यांचे कवितेबद्दल आतां नवीन आदर उत्पन्न करावयास नकोच आहे. पहिल्या भागानेंच तें काम उत्तम रीतीनें केलें आहे. सुवासिक पुष्पें कोठेंही ठेविलीं तरी त्यांचा परिमल थोडाच लपून राहणार !

ह्या भागांतलि सुमनांचा परिचय करून देण्याबद्दल कविवर्य तात्यासाहेब केळकर यांना जितक्या आग्रहानें विनंति केली तितक्याच आनंदानें त्यांनीं ती मान्य करून संग्राहकास कायमचें ऋणबद्ध केलें आहे, याबद्दल शाब्दिक आभार ते किती मानावयाचे ? साहित्यसंमेलनाचे सुप्रसंगीं विजय प्रेसचे " गोखलेबंधु " यांनीं हा संग्रह छापून दिला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

६८३ सदाशिव,<br>शांतिकुंज, पुणें,<br>२० मे १९२७.

दिनकर गंगाधर केळकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ठाणे.

# कवितानुक्रम


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ प्रणयोन्माद ... ... ... | १ |
| २ माझें कोडें ... ... ... | २ |
| ३ हा क्षण ... ... ... ... | ३ |
| ४ ब० वा० लोकमान्यांस ... ... | ४ |
| ५ बघुनि तया मज होय कसेंसें ! ... ... | ७ |
| ६ रहस्यस्फोट ... ... ... | ८ |
| ७ स्त्रीजातीस ... ... ... | ९ |
| ८ तें दूध तुझ्या त्या घटांतलें ! ... ... | १० |
| ९ प्रिया नववधू मी बावरतें ... ... | ११ |
| १० साउली ... ... ... ... | १२ |
| ११ क्षणसाफल्य ... ... ... | १३ |
| १२ प्रभातदूती ... ... ... | १४ |
| १३ मृत्यूची हांक ... ... ... | १५ |
| १४ मूक-संगीत ... ... ... | १६ |
| १५ आरोहण... ... ... ... | १७ |
| १६ अजात व अज्ञात सख्याप्रत ... ... | १८ |
| १७ त्या दारावरुनी कोण रिघे ! ... ... | २० |
| १८ या वेळीं माझ्या ये रमणा ! ... ... | २१ |
| १९ तुझी शपथ ... ... ... | २२ |

| नांव | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| २० घातली एकदां अतां उडी | ... | | ... | २३ |
| २१ रुद्रास आवाहन | ... | ... | ... | २४ |
| २२ पोषाख ... | ... | ... | ... | २५ |
| २३ उद्यांची गति | ... | ... | ... | २६ |
| २४ प्रस्थान ... | ... | ... | ... | २९ |
| २५ घाबरूं नको | ... | ... | ... | ३१ |
| २६ आलों ! थांब्व शिंग ! | | ... | ... | ३२ |
| २७ जन पळभर म्हणतिल हाय हाय ! | | | ... | ३३ |
| २८ निरोप घेतांना | ... | ... | ... | ३४ |
| २९ मरणांत खरोखर जग जगतें ! | | ... | ... | ३५ |
| ३० चंद्रा मार्ग धरीं आपुला ! | | ... | ... | ३७ |
| ३१ गाडी बदलली | ... | ... | ... | ३८ |
| ३२ किति महामूर्ख तूं शहाजहां | | ... | ... | ३९ |
| ३३ जीवितसाफल्य | ... | ... | ... | ४१ |
| ३४ कुठें जिवाचा चोर | ... | ... | ... | ४२ |
| ३५ कवणें रूपीं येइल माझ्या घरीं | | ... | ... | ४३ |
| ३६ वैरिण झाली नदी | ... | ... | ... | ४४ |
| ३७ माउली ... | ... | ... | ... | ४५ |
| ३८ सांवळी ... | ... | ... | ... | ४६ |
| ३९ कळा ज्या लागल्या जीवा ! | | ... | ... | ४८ |
| ४० फेरीवाला | ... | ... | ... | ४९ |
| ४१ उडाला पक्षि पिंजऱ्यांतुनी ! | | ... | ... | ५० |

| नांव | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| ४२ दृष्ट हिला लागली | ... | ... | ... | ५२ |
| ४३ मनोमय चित्रें रचिं सुंदरी | | ... | ... | ५४ |
| ४४ निष्ठुर !... | ... | ... | ... | ५५ |
| ४५ घट भरा शिगोसिग भरा भरा !... | | | ... | ५६ |
| ४६ रिकामा घट पाहून | ... | ... | ... | ५७ |
| ४७ अजि पुनवेची शारदि रात | | ... | ... | ५९ |
| ४८ कवणे मुलुखा जाशी ? | | ... | ... | ६० |
| ४९ रतलें परपुरुषार्शी | ... | ... | ... | ६१ |
| ५० हिंदु विधवेचें मन | ... | ... | ... | ६३ |
| ५१ दे पूर्ण हृदय सुंदरी ... | | ... | ... | ६५ |
| ५२ बलोद्धतांस | ... | ... | ... | ६६ |
| ५३ अंगाईगीत | ... | ... | ... | ६७ |
| ५४ समजुनि बांध शिदोरी ! | | ... | ... | ६९ |
| ५५ अशांचें कोण करिल तरि काय ?... | | | ... | ७० |
| ५६ कोण रोधील ? | ... | ... | ... | ७१ |
| ५७ अब तुम जयजयकार करो | | ... | ... | ७२ |
| ५८ प्रतिज्ञा ... | ... | ... | ... | ७३ |
| ५९ बसंत फेरीवाला | ... | ... | ... | ७४ |
| ६० जेव्हां लोचन हे तुझे विहरती | | ... | ... | ७४ |
| ६१ तूं कवण जगांतिल ललना ? | | ... | ... | ७५ |
| ६२ भूपाळी ... | ... | ... | ... | ७६ |
| ६३ मान न करिं गे ! | ... | ... | ... | ७८ |

नांव ... पृष्ठ

६४ उडाला हंस! ... ... ... ७९
६५ बिनति सुनो आज ... ... ... ८१
६६ राधा झूलत माधव संग ... ... ८२
६७ निर्धार ... ... ... ... ८४
६८ ते कांत यापुढें मीहि तयांची कांता ... ८५
६९ तुम्ही उतरतां! ... ... ... ८७
७० तुझी हालचाल ... ... ... ८८
७१ तुझे लोचन ... ... ... ८९
७२ घन तमीं शुक्र बघ राज्य करी! ... ... ९०
७३ आरती ... ... ... ... ९१

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ठाणे.



कवि- भास्कर रामचंद्र तांबे

# तांबे यांची कविता

## [ भाग दुसरा ]

ग्रंथ संग्रह ... ८६३ ... काव्य ...

### प्रणयोन्माद

[ राग—सोहनी ]

चल, जळो ज्ञानविज्ञान गड्या !
लखलाभ होउ पंडितमन्या ! !
फाड पटाला, फोड घटाला !
अजुनि ये न यांचा कंटाळा !
जपलें प्राणाहुनि मी ज्याला,
उधळ हिरे, मोत्यें सखया ! ॥ चल० ॥ १

देति शिव्या पंडित मद्याला,
गटगट पिउं पेल्यावरि पेला !
दिली तिलांजलि सुज्ञपणाला !
हंसतिल हंसोत ते उभयां ! ॥ चल० ॥ २

कडकड मोडिल गगन-मांडवा,
फाडुनि उधळिल दिशांस अथवा,
अशा वादळा सोड भैरवा !
बंद तटातट तोड सख्या ! ॥ चल० ॥ ३

काय जागणें, कसलें निजणें !
टाक फाडुनी सारीं स्वप्नें !
चिंध्या चिंध्या करुनि उधळणें !
काळ-शिरीं चल नाचाया ! ॥ चल० ॥ ४

तूं राजा मी राणी, कांता !
भीड लाज मग कशास आतां ?
होउनि केवळ निसंग नाथा !
रंगीं रंग मिसळीं सदया ! ॥ चल० ॥ ५

प्रतापगड, ६-८-२०

---

## माझें कोडें

[ राग—कालिंगडा ]

कुणि कोडें माझें उकलिल का ?
कुणि शास्त्री रहस्य कळविल का ?
हृदयिं तुझ्या सखि दीप पाजळे
प्रभा मुखावरि माझ्या उजळे !
नवरत्नें तूं तुज भूषविलें
मन माझें खुललें आंतिल कां ? ॥ कुणि० ॥ १

गुलाब माझ्या हृदयीं फुलला
रंग तुझ्या गालांवर खुलला !
कांटा माझ्या पायीं रुतला
शूल तुझ्या उरिं कोमल कां ? ॥ कुणि० ॥ २

माझ्या शिरिं ढग निळा डंवरला
तुझ्या नयनिं पाउस खळखळला !
शरच्चंद्र या हृदयिं उगवला
प्रभा तुझ्या उरिं शितल कां ? ॥ कुणि० ॥ ३

मद्याचा मी प्यालों प्याला,
प्रिये, तयाचा मद तुज आला !
कुणीं जखडिलें दोन जिवांला
मंत्र-बंधनीं केवल का ? ॥ कुणि० ॥ ४

प्रतापगड, ५-९-२०

---

## हा क्षण

[ राग—कानडा ]

मग विसर हवा तर हा क्षण गे !
क्षण हाच जवळ ये तूं पण गे !
अनंत जन्मांचें शुभ संचित
क्षणीं याच गे होवो कुसुमित !
दिव्य करो हा क्षण अविलंबित
ये करुं दे आत्म-समर्पण गे ! ॥मग०॥ १

सूर्य चंद्र सारे तारकगण
यक्ष देव दानव सारेजण
क्षणा याच देवोत सैरषण
ही थांबवोनियां वणवण गे ! ॥ मग०॥ २

पूर्ण विश्व-लयिं अति एकांतीं
तुझी ज्योति पसरो स्थिर कांती
मिळो त्यांत मम, फिटुनी भ्रांती !
ये ! धरिस मूक मम भाषण गे ! ॥ मग० ॥ ३

ध्रुव धरणी हो चरणाखालीं
वितळुनि जावो नच पाताळीं
तुझि माझी जों ग्रंथि न झाली;
मग उधळो तीचा कण कण गे ! ॥ मग० ॥ ४

प्रतापगड, ८-९-२०

---

## पं० वा० लोकमान्यांस.

[ राग—जोगी. ]

राजराजेश्वरों ! हो दयाला !
तांतडी कां असे हो निघालां ?
अंधकारीं पहातां नभांत,
किर्र बोले अजूनीहि रात,
कुक्कुटाचा नसे शब्द झाला !
पहांटेचा न तारा निघाला !
हांक कोणीं दिली हो तुम्हांला ?
तांतडी कां असे हो निघालां ? १

रात्र सारी न निद्रा तुम्हांला !
देह कष्टांमधीं रोड झाला !
व्यापसंताप सोसूनि सारा,
वैरियांचाहि साहून मारा,
लात हाणोनियां हो सुखाला,
कष्टवीलें सदा कीं जिवाला
घांस नाहिं सुखाचाहि ठावा,
नाहिं ठावा शरीरा विसांवा
जयासाठीं असा व्याप केला,
नाहिं भानू अजोनी उदेला !
काय याहूनि प्रिय हो तुम्हांला ?
तांतडी कां असे हो निघालां ? २
श्रांत क्लांता किं हो पाउलांला,
नाहिं संधी चुराया मिळाला !
नाहिं पत्रें फुलें पूजण्याला
वेळ आम्हां मिळाली, दयाला !
कुठें आतां बघूं त्या मुखाला ?
बंदु कैसें अतां पाउलांला ?
गूढ संदेश कोठूनि आला ?
तांतडी कां असे हो निघालां ? ३
नाहिं मार्गार्थ केली शिदोरी
नाहिं हातांत तांब्या न दोरी !

शीघ्र सारा त्यजोनी पसारा
कांहिं केल्याविना हो विचारा
उठाऊठी कसे हो निघालां ?
काय झालें असें हो दयाला ?
आमच्या हो जरी काळिजाचे,
आमच्या हो जरी आंतड्याचे
दोर बांधूं पहाती पदांला
तरि नाथा ! कसे हो निघालां
काळिजांतील साऱ्याहि गीती
आडव्या कीं तुम्हां साश्रु येती !
तरि पाहोनियांही न त्यांला
तांतडी कां असे हो निघालां ! ४

कोणतें हो असें शिंग दूरी
घोर रात्रीं तुम्हां हांक मारी ?
कोणता हो तरि मंत्र नाथा ?
भूल घाली महाराज ! आतां ?
कोठली हो स्मृती होय जागी ?
भरे वारें अकस्मात अंगीं ?
दुर्ग कोठील, कोठील वाडे
बाग कोठील कोठील झाडें
मोह घालोनि नेती तुम्हांला ?
तांतडी कां असे हो निघालां ? ५

प्रतापगड, १२-९-२०

---

# बघुनि तया मज होय कसेंसें !

[ राग-पिलू ]

बघुनि तया मज होय कसेंसें !
झुरसि मना कां भरुनि तुज पिसें !
हीन दीन मी ब्राह्मण विधवा
तृणसम जन मज टाकि जणुं शवा !
वासना भुतें भिवविति जीवा !
शरीर जीवा हें थडगेंसें ! ॥ बघुनि० ॥ १

हृदयतळीं वळवळति कल्पना !
हाय मना ही काय हेलना !
जविन-गीतिंत फससि कां मना ?
जालि पांखरूं हाय जणुं फसे ! ॥ बघुनि० ॥ २

आसन त्यास्तव घालायाला
वसन चुणुनियां ठेवायाला
हस्तांनो ! फुरफूर कशाला ?
कळे तया का ? काय तो पुसे ? ॥ बघुनि० ॥ ३

बघुनि तया कां डोळे वळती ?
येतां तो कां पायहि पळती ?
कान लपुनि कां शब्द ऐकती ?
हा रे दैवा कां हें घुमसे ? ॥ बघुनि० ॥ ४

जीव तयाच्या प्रकाशीं रिझे
आहुतिसा जळण्यासही सजे
हा रे दैवा ! कां हें नुमजे
निष्फळ हें ! मग हाय कां असें ? ॥ बघुनि० ॥ ५
फूल सूर्यमुखि भूवरि नभिं रवि,
अविरत चंड-किरणिं मुख फिरवी,
जातां तो दुःखें मुख झुकवी
जळुनि राख हो किरणिं ! हें तसें ॥ बघुनि० ॥ ६

प्रतापगड, २३-९-२०

---

## रहस्यस्फोट !

[ राग—भैरवी ]

वद, काय खुपे तुजला स्वमनीं ?
तूं लपविसि तरुणा कां म्हणुनी ?
चंद्र हर-शिरीं जाउनि सजला !
प्रसंग भयकर परि ओढवला !
स्मरशर ओझरता का रुतला ?
घाव न ये अजुनी भरुनी ? ॥ १
कितिहि करी पोषाख भरजरी !
वरवर हांसे हसें मधुर जरि
लाजुनि यापरि घाव लपवि तरि
लपुं शके न छाया विधु-वदनीं ॥ २

गृहविहीन नाभिं पांथ भ्रमणा
करी, तयाचा जादूटोणा
कधीं स्पर्शला तुजला तरुणा ?
कां बघसि असा रे गोंधळुनी ? ॥ ३

कधीं कुणीं डोळ्यांतुनि तुजला
बाण काळिजीं काय टाकिला
घाव खोल जो त्याचा पडला
चल हलकें कर उर, बोलोनी ! ॥ ४

खळखळ रस जरि वाणी प्रसवी
तुझें हास्य जरि इतरां हंसवी
विलासलीला तशीच फसवी
परि झळके छाया किति नयनीं ! ॥ ५

प्रमदांच्या तूं कथा सांगसी
व्याजस्तुतिनें इतरां दिपविसि
न कळत तापुनि परी बरळसी
तव जळजळ उसळे प्रतिवचनीं ! ॥ ६

प्रतापगड, २४-९-२०

---

## स्त्रीजातीस !

[ राग—भूप ]

भयचकित नमावें तुज, रमणी
जन कसे तुडविती तुज चरणीं !

महाकवी, तत्त्वज्ञ, भूपती,
समरधुरंधर वीर धीर-गति
स्थितप्रज्ञ हरि उरीं कोंडिती,
प्रसव तयांचा तूं जननी ! ॥ भयचकित०॥　१

भूत निघाला तव उदरांतुन
वर्तमान घे अंकीं लोळण
भविष्य पाही मुली ! रात्रंदिन
तव हांकेची वाट मनीं ! ॥ भयचकित०॥　२

तुझ्या कांतिनें चंद्र झळझळे
फुला फूलपण मुली ! तुजमुळें !
रत्नीं राग तुझा गे उजळे !
तुजसाठीं ही प्रिय भगिनी ! ॥ भयचकित० ॥ ३

प्रतापगड, ३०-९-२०

---

## तें दूध तुझ्या त्या घटांतलें !

[ राग—कालिंगडा ]

तें दूध तुझ्या त्या घटांतलें !
कां अधिक गोड लागे न कळे !
साईहुनि मउमउ बोटें तीं !
झुरुमुरु झुरुमुरु धार काढिती !
रुणझुणु कंकण करिती गीती !
कां गान मनांतिल त्यांत मिळे ! ॥ तें दूध०॥　१

अंधुक श्यामल वेळ, टेंकडी,
झरा, शेत, त्यामधें झोंपडी !
त्यांची देवी धारहि काढी !
कां स्वप्नभूमि विंबुनि मिसळे ! ॥ तें दूध०॥ २
या दृश्याचा मोह अनावर
पायां ओढुनि आणी सत्वर
जादु येथची पसरी मजवर !
कां दूध गोडही त्याचमुळें ? ॥ तें दूध०॥ ३

प्रतापगड, ३-१०-२०

---

## नव वधू प्रिया, मी बावरतें !

[ राग—ललत ]

नव वधू, प्रिया मी बावरतें !
लाजतें, पुढें सरतें, फिरतें !
कळे मला तूं प्राण-सखा जरि,
कळे तूंच आधार सुखा जरि
तुजवांचुनि संसार फुका जरि
मन जवळ यावया गांगरतें ! ॥ नव-वधू० ॥ १
मला येथला लागला लळा
सासरिं निघतां दाटतो गळा
बागबगीचा येथला मळा
सोडितां कसें मन चरचरतें ! ॥ नव-वधू० ॥ २

[library stamp]

जीव मनींच्या मनीं तळमळे
वाटे बंधन करुनि मोकळें
पळत निघावें तुजजवळ बळें
परि काय करूं ? उरिं भरभरतें ! ॥ नव-वधू० ॥ ३
चित्र तुझें घेउनि हृदयावरि
हारतुरे घालितें परोपरि
छायेवरि संतोष खुळी करिं
तूं बोलवितां परि थरथरतें ! ॥ नव-वधू० ॥ ४
अतां तूंच भय-लाज हरीं रे
धीर देउनी ने नवरी रे
भरून येउत नेत्र जरी रे
कळ पळभर ! मात्र खरें घर तें ! ॥ नव-वधू० ॥ ५

प्रतापगड, १२-१०-२०

---

## साउली

[ राग–कालिंगडा ]

पावलोपावलीं साउलि ही !
पाठीस सारखी लागलि ही !
कैद्यामागें सक्त पहारा
त्यावरि करडा राहि दरारा !
या साउलिचा तसा शशिमिरा
लागला ! वृत्ति मम कावलि ही ॥ पावलो० ॥ १

टाळूं पाहें तरी टळेना !
हात जोडिले तरी वळेना !
क्षणभर मज एकांत मिळेना !
कोठली पिशाची लागलि ही ! ॥ पावलो० ॥ २
बसलों मी, ही पीडा बसली !
उठलों उठली, निजलों निजली !
रडलों रडली, हंसलों हंसली !
वांकोल्यांची माउलि ही ! ॥ पावलो० ॥ ३

प्रतापगड, १५-१०-२०

---

## क्षणसाफल्य !

[ राग—हमीर ]

क्षण सुवर्ण-कण झाले, रमणा !
स्पर्शली तुझी न कळत करुणा !
स्पर्शक्षम हे सगुण जरि क्षण
कळे न त्यांचें मोल मला पण
घरीं लोळती जसे रजःकण !
चिंता तुज रे अशरण-शरणा ! ॥ क्षण० ॥ १
मिळे पारखी तुझ्या दयेनें
तो शोधुनि वेंचोनि तयां ने
हार रचुनि अर्पिला तयानें
त्या जनता-रूप तुझ्या चरणा ॥ क्षण० ॥ २

दयाघना पारख्या माझिया !
रमण-मंदिरीं रुजू तव दया !
उपकृति गाऊं फुका कासया ?
जाणतो तोच तव थोरपणा ! ॥ क्षण०॥ ३

प्रतापगड, १६-१०-२०

---

## प्रभातदूती !

[ राग—कालिंगडा ]

सोन्याची घेउनि करिं झारी
ये आज पहांट ! उभी दारीं !

करतल पदतल कोमल रक्तिम
गुलाब फुलले जसे मनोरम !
सुवर्णकांती फांके अनुपम !
ही आज मला हांका मारी ! ॥ सोन्याची०॥ १

" रमणाच्या सोन्याच्या मंदिरिं
" सोन्याच्या रे झोंपाळ्यावरि
" निजलें झुलवी निद्रासुंदरि
" मज गाउनि गाणें जरतारी ! ॥ सोन्याची०॥ २

" रमण म्हणे 'जा ऊठ पहांटे !
" बाळा रुतति विदेशीं कांटे,
" स्मरतां त्यास कसेंसें वाटे,
" ने अमृत भरे जें भांडारीं ! ॥ सोन्याची०॥ ३

" घोर तमाच्या दाट घटांतुनि
" क्रमित वाट तारकजालांतुनि
" चालत आलें बघ ऊंचालुनि
" रे! उभी तुझ्या मी शेजारीं! ॥ सोन्याची० ॥ ४

" धुंदि तुझ्या परि अजुनी नयनीं!
" जांभया कसा घेसी पडुनी!
" उघड नयन! जा अमृत घेउनी!
" कां निजसि मुला! तूं अंधारीं!" ॥ सोन्याची० ॥ ५

इंदूर, ३-११-२०

---

## मृत्यूची हांक!

[ राग—जोगी ]

आव्हानशृंग तव तीव्र कसें
रे मरण, सुटे पळ! भरे पिसें! ॥ ध्रु० ॥

विसरे जन कीं हवी शिदोरी
विसरे तांब्या किंवा दोरी
विसरे वस्त्रें जुनिं कीं कोरीं
मग तुमान धोतर कोण पुसे? ॥ आव्हान० ॥ १

विसरे कीं मज मार्ग न ठावा
उजेड कीं अंधार मिळावा
स्नेह मिळे कीं मिळेल दावा
मग धीर नसे वा भीति नसे! ॥ आव्हान० ॥ २

ह्या जगतांतिल साऱ्या गीती
जरि काकुळती धांवत येती
स्वर-जालीं चरणा आंवळिती
परि काय रडे कीं काय हंसें ? ॥ आव्हान० ॥ ३
आशेनें कीं नैराश्यानें
माधुर्यानें कीं लवणानें
भरे कुंभ जो क्षणाक्षणानें
निमिषांत तुझ्या पदिं वाहतसे ॥ आव्हान० ॥ ४

इंदूर, ४-११-२०

---

## मूक-संगीत !

[ राग—मांड ]

हे मन ! तव मंदिरिं गान भरे
कुणिकडे बघसि आश्चर्यभरें ?
सप्त सुरांचें त्यास न बंधन !
अडखळे न तें जड शब्दांतुन !
माधुर्यच माधुर्य भरे, मन !
माधुर्याविण कांहिं न दुसरें ! ॥ हे० ॥ १
तेंच फुलांच्या मार्दविं फुललें !
सुवर्णवर्णीं उषेंत खुललें !
सायंतानिं, जालिं वनिं घनिं झुललें !
रे उघड नयन बघ नीट पुरें ! ॥ हे० ॥ २

परि फुलास तूं पुससी भलतें–
औषध, मधु देशिल का मातें ?
चिरतां चुरतां तुज का मिळतें ?
छे ? चल मग निघ तव डौल पुरे ! ॥ हे० ॥ ३

हाय मना तव कपाळ फुटलें !
तुझ्याच घरचें तुलाच न कळे !
जन्ममरणिं बघ ! खेटर न मिळे !
जा फोड ऊर ! तळमळ ! मर रे ! ॥ हे० ॥ ४

इंदूर, ५-११-२०

---

## आरोहण !

[ राग–परज ]

या प्रकाशशिखरीं कुणिकडुनी
मज चढविसि वाटाड्या धरुनी ? ॥ ध्रु० ॥

खोल दऱ्यांच्या घोर तमांतुनि
काजळि काळ्याकुट्ट जळांतुनि,
वळणांतुनि, घन वनस्थळांतुनि,
चढविलेंस कुठुनी वरि जपुनी ? ॥ या० ॥ १

मागें वळतां वाट नच दिसे
पुढें पाहतां वाट न गवसे
पुन्हां पुन्हां मी म्हणुनि तुज पुसें
रे नेशिल कोठें मज अजुनी ? ॥ या० ॥ २

++
++

चढण अशिच का पुढेंहि राया ?
लागतील का सुंदर राया ?
विश्रांतीस्तव मिळति सराया ?
रे वाटाड्या श्रमलों भ्रमुनी ! ॥ या० ॥ ३
तुझीं पाउलें येती कानीं
धीर जरा ये जरी तयांनीं
किति हिंडावें तरि रानीं वनीं
तें दूर किती रे घर अजुनी ? ॥ या० ॥ ४
पार नसे रे तुझ्या कधिं ऋणा
या शरिराच्या करुनि वाहणा
वाटाड्या घालिन जरि चरणा
उतराई होणें न जनीं ! ॥ या० ॥ ५

इंदूर, ११-११-२०

---

## अजात व अज्ञात मित्रांप्रत !

[ राग–जोगी ]

पांखरूं पंजरीं फडफडतें !
आदळे पंख शिर आपटतें !
वर्तमान ! तव अजस्त्रकारा !
कुठुनि निघाया न दिसे थारा !
बाहेरिल नच फिरके वारा !
आंतल्या आंत मन हें कढतें ! ॥ पांखरूं० ॥ १

भविष्याचिया दूर कड्यांवरि !
सखे घुमविती मंजुळ बांसरि !
अंधुक मंदचि येति लकेरी !
भडभडे ऊर ! मन तडफडतें ! ॥ पांखरूं० ॥ २

अजात हो अज्ञात सखे जन !
जेव्हां तुमची होय आठवण !
विसरे मन भिंतीचें वेष्टण !
शिर भिंतीवर निघतां फुटतें ! ॥ पांखरूं० ॥ ३

हृदयाच्या माझ्या आकाशीं
आंतिल सूर्याचिया प्रकाशीं
तुमच्या छाया पडतां त्यांशीं
कुजबुजे, गमे, मन ! बडबडतें ! ॥ पांखरूं० ॥ ४

या कुजबुजिच्या अंधुक ताना
शतकांतुनि कां रिघतिल काना ?
डोलवाल का सांगा माना ?
का स्मराल मन जें धडपडतें ? ॥ पांखरूं० ॥ ५

इंदूर, १६-११-२०

---

# त्या दारावरुनि कोण रिघे !

[ राग—कालिंगडा ]

त्या दारावरुनी कोण निघे ?
बाराही चोराघरी रिघे !
निद्रारस संध्या न शिंपडे
चंद्रशांतिचा सडा न तिकडे
करुनी निसटे चोरसा गडे
नभ उघडुनि डोळे कधिं न बघे ॥ त्या० ॥ १
सुवास-सुरिं गे फुलें न गाती
परस्परीं नच कधिं कुजबुजती
सुखदुःखाच्या गोष्टि न करिती
यम घुमटीं काळी घोंगडि घे ॥ त्या० ॥ २
भुतें त्या घरीं सभा भरविती !
विकट हास्य विक्राळचि करिती !
विचित्र चाळे करुनि नाचती !
गे विचित्र त्या घरचें अवघें ॥ त्या० ॥ ३
आपण फिरकूं तिथें न सुंदरि
बसोनि राहूं गे घरचे घरिं
घरींच घुमवूं गोड बांसरी !
कधिं नांवही न त्या घरचें घे ॥ त्या० ॥ ४

इंदूर, २४-११-२०

---

## या वेळीं माझ्या ये रमणा !

[ राग—जोगी ]

या वेळीं माझ्या ये रमणा
शांतीची द्वाहि फिरे सजणा ॥ ध्रु० ॥
गहन रात्र घनघोर पसरली
जादुगार झोंपेनें अंगुलि
चहूंकडे हळुहळू फिरविली
ती मिटवी कमळापरि नयनां ॥ या० ॥ १
अधांतरीं बघ घरटीं झुलतां
गुपचुप झाली बघतां बघतां
तरुंची कुजबुज थांबली अतां
वेळूंची थिजलि सख्या ! वीणा ॥ या० ॥ २
नभें दाट पांघरली दुलई
मात्र मिणमिणे घरांत समई
कीं तुज वाट दिसो या समयीं
जागें कामातुर तुझ्याविना ! ॥ या० ॥ ३
कानोसा मी घेतां थकलें
तुझीं न ऐकूं येति पाउलें
कां मग मजला वेड लाविलें
किति बिलंब करशिल आगमना ? ॥ या० ॥ ४
फटफटतां होईल कशी गति
दारावरि ठोठवतिल रे किति
सळोपळो मज करतिल रे अति
ठावा तुज त्यांचा क्रूरपणा ॥ या० ॥ ५

इंदूर, २४-११-२०.

## तुझी शपथ

[ राग—कालिंगडा ]

गे शपथ तुझी मी वदें खरें
स्पर्शे तुझिया मी मज विसरें ! ॥ ध्रु० ॥

सुखदुःखाची मादक वारुणि
गोड जहाली तुझ्या कारणीं
उन्मादीं कळ कळे न रमणी
कडुपणांत गोडी प्रिये ! भरे १

गृहकर्मी कीं राजकारणीं,
सुखशयनीं, बाजारीं, भ्रमणीं,
हरिभजनीं कीं भयानक रणीं
गे गुप्त तुझी मूर्ती विचरे ! २

गार गारगोटींत ज्यापरी
गुप्त अग्नि वावरे सुंदरी
दुनियेच्या हाटांत खरोखरि
गे गुप्त उजेड तुझाच पडे ३

सागरावरी ओहटि भरती
शांत लहरिंवर किरण नाचती
तुफान हो तारवेंहि फुटती
या विविधरूपिं जळ एक भरे ४

त्यापरि माझ्या विविध तरंगीं
विविध रंगिं तूं रक्तिम रंगीं
विविधरूपिं तूं अविविध संगीं
माझेंपण तुझिया उरीं मुरे ! ५

इंदूर, २६-११-२०.

# घातली एकदां अतां उडी !

[ राग–ललत ]

रे ! बुडव लाव वा पैलथडी !
साहस म्हण कीं पोरपणा म्हण,
भाबडेपणा, स्वैरपणा म्हण,
नादिषणा, अविचारिषणा म्हण,
पण गेली ती परते न घडी ! १
मोह अचानक पडे मजवरी
खर्कन् पदरचि गळे पळांतरिं
नग्नचि झालें न कळत सत्वरिं
तूं घाल शाल टाकीं उघडी ! २
आतां कैचें मागें वळणें
तुजसह लाटांवरि रे झुलणें,
तुझ्या समोरचि जगणें मरणें,
आतां तूं नाविक, तूंच गडी ! ३
सर्वस्वीं रे अपराधी मी !
लबाड म्हण कीं म्हण साधी मी,
विचार केला नच आधीं मीं !
तूं क्षमा करीं अथवा ताडीं ४
आतां कांहिं न रे माझ्या करिं
सर्वस्वीं रे भार तुजवरी !
मार तार ! छळ करीं ! प्रीति करिं !
घेतली तुझ्या मीं उरीं बुडी ! ५

इंदूर, १-१२-२०.

## रुद्रास आवाहन!

[ बिभास—झंपा ]

डुमडुमत डमरु ये! खण्खणत शृंग ये!
शंख फुंकीत ये! येइं रुद्रा!
प्रलय-घन-भैरवा करित कर्कश रवा
क्रूर विक्राळ घे क्रुद्ध मुद्रा!
कडकडां फोड नभ, तोड रविमालिका!
खडबडावि दिग्गजां तुडव दिक्पालकां!
मांड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका!
खवळवीं चहुंकडे ह्या समुद्रां! १

पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं!
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालतीं!
मुकुट रंकास दे, करटि भूपांप्रती!
झाड खट्खट तुझें खड्ग क्षुद्रां! २

जळ तडागीं सडे! बुडबुडे! तडतडे!
'शांति ही!' बापुडे बडबडति जन किडे!
धडधडा फोड तट, रुद्र! ये चहुंकडे!
धगधगित अग्निमधिं उजळ भद्रा! ३

पूर्वि नरसिंह तूं प्रगटुनी फाडिले
दुष्ट जयिं अन्य-गृहिं दरवडे पाडिले
बनुनि नृप, तापुनी चंड, जन नाडिले!
दे जयांचें तयां वीरभद्रा! ४

इंदूर, ३-१२-२०

# पोशाख !

[ राग–मालकंस ]

पोशाख नवनवा मला दिला
नवनवा मुलुख मज दाखविला ॥ ध्रु० ॥

तयार करुनी मम सामुग्री
मधुर दयारस भरुनि समग्रीं
घाडुनि आई ! आधीं अग्रीं
धाडिलें लाडक्या मला मुला ! १

एकाहुनियां एक भरजरी
वस्त्रें, अस्त्रें देसि परोपरि
लाड पुरविसी किती खरोखरि
किति माझें कौतुक तरि तुजला ? २

कार्यविशेषें जेथें जाईं
तुझ्या दयेचा तेथें आई
सदा पहारा ठायीं ठायीं
सांभाळि सभोंवति गे मजला ३

या मुलुखाची पाहुनि शोभा
लालचुनी मन लागे लोभा
देसी तूं, मी मिरवीं टेंभा
निज पराक्रमचि समजें सगळा ! ४

अंत नसे गे त्वत्प्रेमातें
अशा तुला मी विसरें माते !
उदरीं घालुनि अपराधातें
राग न तूं माते ! धरिला ! ५

जुनीं जाहलीं वस्त्रें पाहुनि
बोलाविसि मज पान्हा फुटुनी
उरीं लावुनी, नवीं लेववुनि
धाडिसी श्रेष्ठतर कार्यि मला
पोशाख नवनवा मला दिला ! ६

इंदूर, २-१९२१

---

## उद्यांची गति !

[राग–भूपालि]

उद्यांची काय कळे रे गती ?
पळ पळ पळतो काळ पिळित जन !
करीं प्रीति संप्रती !
कुठें ते थोर वीर भूपती ?
राख करुनि मिळविली, निघाली
त्यांसह कां भूमि ती ?

तुझी मग दमडी, दिडकी टका
गळे पिळुनि मिळविसी तुझ्या तो
संगें येईल का ?

नाच तूं !–काळ गालिं हांसतो !
पाहुनी पिंगा, हळु खासतो !
निमिष हो भीतीचा भासतो !

तरी बंधुशिरिं लाथ हाणुनी
फुगुनी होसी कृती ! ॥ उद्यांची० ॥ १

फुले रे प्रीति तीच जगतीं !
अनंत रंगीं फुलें ठुमकती !
बाग कशी पाहिं ती

तुडुंबे मधु त्यांच्या द्रोणीं !
वेडी होइल बघुनि शारदा !
वर्णावीं तीं कुणीं ?

कुणाशीं वैर ? कशाचें तरी !
जिकडे तिकडे तुझेंच काळिज !
बघूं नको वरिवरी !

पहा ही खरी कशी वैखरी !
हृदयाच्या भाषेंत फुलां पुस
उत्तर देतिल तरी !

कुणावरि शस्त्र उचलशी तरी ?
पुढें फुलें रे तुझ्या जिवाचीं !
आत्मघात नच करीं !

पळे मग पुढचें रे सांकडें !
स्वयें मृत्यु निज शस्त्र चरणिं तव
अर्पिल करुनी नती ॥ उद्यांची० ॥ २

कशाची तळमळ हळहळ तरी ?
स्वयें निर्मुनी गरळ भोंवतीं
हाय् घेसिं अंतरीं

कळे रे ! काय कधीं पामरा !
प्रीति-दूत किति तुझ्या रक्षणीं
करिति खडा पाहरा ?

तयांच्या दयार्द्र दृष्टीविना
पळभर तरि जगशील काय रे ?
उघड जरा लोचना !—

सूर्य जरि निमिष झांकि लोचन !
निजे जर वायू एक क्षण !
न दे जळ पळभरि जरि दर्शन !

कुणिकडे तूं ? कुठें धरा रे ?
कोण पुसे दुर्गती ? ॥ उद्यांची० ॥ ३

खळखळे प्रीतीची वाहिनी !
चहूंकडे मधु मंजुळ निघतो
कसा जीवन-ध्वनी !
रडसि कां तूंच ! गान भंगुनी !
घे धुवुनी गंगेंत वाहत्या
हात तूंहि रंगुनी !
षळाचा काय भरंवसा तरी ?
या गंगेचें मूळ शोध जा
त्वरें तांतडी करीं !
अहाहा ! वानूं कवण्या मुखें ?
त्यावरी ओंवाळी भव-सुखें !
रंग रति-रसीं ! मृत्युंजय हो !
काळ काळ तो किती ? ॥ उद्यांची० ॥ ४

इंदूर, २१-२-२१

---

## प्रस्थान.

[ चाल—बघुनि त्या भयंकर भूता० ]
दैत्यशी छातिवर ठेली तुजपुढें रात्र अंधारी !
चल, जिवा ! चालणें आलें; कां उगा बघसि माघारीं ?
मुरडोनि कुणाला बघसी ? ये कोण तुझ्या सांगातीं ?
चल, उचल बोचकें अपुलें, जोडिलें तूंच जें हातीं

कडु, गोड, तिखट, खारट जी जोडिली शिदोरी अंगें
घे उचल, तीच कामीं ये ! दे कोण आपुली संगें ?
ये हांक किती निकडेची ! लागला तगादा पाठीं !
राहुं दे शाल पागोटीं ! राहुं दे वाहणा काठी !
या घरीं दिवे लखलखती ! तुजपुढें परी अंधार !
परि सराय ही ! न मिराशी हें काय खरें घरदार ?
येथले हार डोळ्यांचे बाहूंचे सुंदर शेले
गुंतविती तुजला मोहीं ! जरि जिवा आडवे ठेले
तरि काय तुला थांबविती ? कधिं कुणा रोंकिलें यांहीं ?
मग कासाविस कां होसी ? चल मार्ग आपुला पाहीं !
येथल्या सतारी वीणा, येथल्या लकीरी ताना
स्वरपंजरिं कोंडूं बघती ! परि तयां तुला धरवेना !
मग चाल मुकाट्या पुढती ! आठवीं कुलस्वामीला !
डोळ्यास अमंगळ पाणी आणीं न अशा शुभ वेळां
ऐक ती क्रूर आरोळी ! दरडावुनि येती हांका !
वाढवेळ आधिंच झाला, मग उशीर आणिक हा कां ?
जरि वाट तुला नच ठावी, तीं ऐक पाउलें, प्राणा !
रे धीर धरीं तूं पोटीं, संगीं ये जगाचा राणा !

अजमेर, ४-८-२१

# घाबरूं नको.

[ राग—दरबारी कानडा ]

घाबरूं नको ! बावरूं नको !
क्षण भीतीनें गांगरूं नको !
जरि शत्रूंचा अजस्र मारा
उलथुनि पाडी जणुं डोलारा
अभेद्य भक्कम किल्ला सारा
तरि वीरा 'हूं चूं' करूं नको ॥ घा० ॥ १
जरी दिशांचे तट ढांसळती
नभ सौधाचे स्तंभ कडाडति
हंडया झुंबर तडतड पडती
तरि हे वीरा ! डगमगूं नको ! ॥ घा० ॥ २
जरी धुळीनें डोळे मिटती,
धूरलोट कंठीं घुरघुरती,
इंद्रियसैनिक धांवुनि सुटती,
तरि रणांगणांतुनि फिरूं नको ! ॥ घा० ॥ ३
निर्वाणीचें काढ सुदर्शन
तळघरांत जें ठेलें लपवुन
मार नेम रे अचूक रोंखुन !
तूं जयश्रीस अंतरूं नको ! ॥ घा० ॥ ४

अजमेर, ६-८-२१

---

## आलों, थांबव शिंग !

[ राग–पूर्वी ]

आलों, थांबव शिंग !—दूता !
किति निकडीनें फुंकसि वरिवरि
कळला मला प्रसंग !—दूता ॥ ध्रु० ॥

जरी सखे जन हाटा निघती,
आर्जवुनी मजला बोलविती,
घरोघरी येती काकुळती,
पहा सोडिला संग—दूता ! ॥ आलों० ॥

जरि नाटकगृह हें गजबजलें,
जरि नानाविध जन हे सजले,
मजविण त्यांचें कितीहि अडलें,
पहा सोडिला रंग !—दूता ! ॥ आलों० ॥

मार्ग अडविला जरि घनतिमिरीं,
जरी खवळलें तुफान सागरिं,
पहा टाकिली होडी मी तरि,
नमुनि तुला साष्टांग !—दूता ! ॥ आलों० ॥ ३

अतां पुकारो फेरीवाला,
गवळी नेवो गाइ वनाला,
स्त्रीजन लागो निजकामाला
झालों मी निःसंग !—दूता ! ॥ आलों० ॥ ४

विसर्जिलीं मीं स्वप्नें सारीं,
आशा लावियल्या माघारीं,
दुनियेच्या आतां बाजारीं
माझा न घडे संग !—दूता ! ॥ आलों० ॥ ५

अजमेर, १४-८-२१

# जन पळभर म्हणतिल हाय हाय !

[ राग-कालिंगडा ]

जन पळभर म्हणतिल 'हाय हाय'!
मी जातां राहिल कार्य काय ! ॥ ध्रु० ॥
सूर्य उगवातिल, चंद्र झळकतिल,
तारे अपुला क्रम आचरतिल,
असेच वारे पुढें वाहतिल !
होईल कांहिं का अंतराय ? ॥ जन० ॥ १
मेघ वर्षतिल, शेतें पिकतिल,
गर्वानें या नद्या वाहतिल,
कुणा काळजी कीं न उमटतिल
पुन्हा तयांवर हेच पाय ? ॥ जन० ॥ २
सखे सोयरे डोळे पुसतिल
पुन्हां आपल्या कामिं लागतिल,
उठतिल, बसतिल, हंसुनि खिदळतिल,
मी जातां त्यांचें काय जाय ? ॥ जन० ॥ ३
रामकृष्ण ही आले गेले,
त्यांविण जग का ओसचि पडलें ?
कुणीं सदोदित सुतका धरिलें ?
काय अडे माझ्याशिवाय ? ॥ जन० ॥ ४
अशा जगास्तव काय कुढावें ?
मोहिं कुणाच्या कां गुंतावें ?
हरि-दूतां कां विन्मुख व्हावें ?
कां जिरवुं नये शांतींत काय ? ॥ जन० ॥ ५

अजमेर, १८-८-२१

---

## निरोप घेतांना !

[ अभंग ]

जगाच्या बागेंत फुललें मी फूल
लागली चाहूल प्रेमी लोकां १

जन जिव्हाळ्याचे भोंवतीं मिळाले
मज सांभाळीलें नानापरी २

अगे मायभूमि किती लाडकें मी !
अंकीं घेसी प्रेमीं मज दीना ! ३

अहा रे वरूणा वर्षोनी करूणा
पाजिलें जीवना दीसंदीस ४

जगाच्या लोचना न्हाणोनी किरणीं
इंद्रचापवर्णीं शृंगारीलें ५

अगा वायुराया ! कोंवळ्या अंगुली
लावोनीयां गालीं हांसवीलें ६

जातें ! मज आतां मंगलाचें धाम
मूर्तिमंत प्रेम बोलावीतें ! ७

घरासीहि जातां हुरहूर वाटे
अश्रुपूर दाटे लोचनांत ! ८

असे हीन दीन साऱ्यांचें मी ऋणी
उपेक्षीलें कोणीं नाहीं दीना ९

नानापरी झाले अपराध कोटी
घालोनीयां पोटीं क्षमा कीजे १०

आतां शेवटील परीसा विनंति
पायीं डोई अंतीं ठेवितसें ११

लोभ असों द्यावा आतां पूर्वीपरी
जरि जाईं दूरी कांळं आड ! १२

सारे प्रेमीजन करा बोळवण !
पुढें आठवण राहूं द्यावी ! १३

अजमेर, १८-८-२१

---

## मरणांत खरोखर जग जगतें !

[ राग–मालकंस ]

मरणांत खरोखर जग जगतें !
अधीं मरण अमरपण ये मग तें ! ॥ ध्रु० ॥

अनंत मरणें आधिं मरावीं
स्वातंत्र्याची आस धरावी
मारिल मरणचि मरणा भावी
मग चिरंजिवपण ये बघ तें ! ॥ मरणांत० ॥ १

सर्वस्वाचें दान आधिं करिं
सर्वस्वच ये स्वयें तुझ्या घरिं
सर्वस्वाचा यज्ञ करीं तरि
रे ! स्वयें सैल बंधन पडतें ! ॥ मरणांत० ॥ २

स्वातंत्र्याचा एकचि ठावा
केवळ यशचि मजला ठावा
यश मार्ग ! हो यश विसांवा !
यशाविण कांहिं का मिळतें ? ॥ मरणांत० ॥ ३

सीता सति यशीं दे निजबाळि !
उजळुनि ये सोन्याची पुतळी !
बळी देउनी बळी हो बळी !
यशेंच पुढें पाउल पडतें ! ॥ मरणांत० ॥ ४

यशिं अहर्निश रवि धगधगतो
स्वसत्त्वदानें पाश छेदितो
नवज्योतिर्गण जन्मुनि जगतो !
रे स्वभाव हा ! उलटें भलतें ! ॥ मरणांत० ॥ ५

प्रकृति-गती ही मनिं उमजुनियां
उठा वीर कार्पण्य त्यजुनियां
मातेस्तव व्हा सज्ज मराया !
बडबडुनी मागुन का मिळतें ? ॥ मरणांत० ॥ ६

अजमेर, २०-८-२१

## चंद्रा ! मार्ग धरीं आपुला !

[ राग—यमनकल्याण ]

उदार चंद्रा ! तुला
नमुनि मी मार्ग धरीं आपुला ! ॥ ध्रु० ॥

शतदां आतां घालीं फेरी
त्रिलोकगामी दृष्टि रुपेरी
दिशादिशांतुनि टाकुनि हेरीं
दिसेन ना प्रेमला—चंद्रा !
मार्ग धरीं आपुला ! १

सागरताळिं रे कर खुपसोनी
हृद्गत ओढीं वर, चेववुनी
वार्ता न मिळे माझी फिरुनी !
पूस जागवुनि जला !—चंद्रा !
मार्ग धरीं आपुला ! २

नदीतटीं कीं सागरतीरीं
दिङ्मृगजलिं वा व्योमसरोवरिं
काल-पुलिनिं वा घालीं फेरी
बघसि न या पाउलां—चंद्रा !
मार्ग धरीं आपुला ! ३

तरुण-तरुणि तूं सहस्र बघशिल !
ज्वाला त्यांच्या उरिं भडकविशिल !
वेलि-वायुसा त्या हालवशिल

स्पर्शील नच मला !—चंद्रा
मार्ग धरीं आपुला ! ४
कमलवनीं वायूस निमंत्रुनि
मजलस भरवुनि मद्य पाजुनी
कळ्या हंसव गुदगुल्या करोनी !
हांसविशिल नच मला !—चंद्रा
मार्ग धरीं आपुला ! ५

अजमेर, २१-८-२१

---

## गाडी बदलली !

[ चाल—चंद्रकांतराजाची कन्या ]

प्रवाहपतिता काष्ठांसम हो ! कर्मधर्मयोगें
रेलेमाधिं भेटले मुशाफर कुणी मनाजोगे १
कुशल प्रश्न जाहले, परस्पर ओळख झाली ती
एक दुजाची वर्दळ सोसुनि सोईला बघती २
पीकपाणि कीं संसाराच्या गप्पा ही निघुनी
मार्गाचे श्रम हलके करिती रंगुनि रंगवुनी ३
डबे निघाले, काला झाला, फराळ मग झाले
चंचि निघाली, विडे लावुनी प्रेमें भक्षियले ४
घटिका भरली संगमभूमी गाड्यांची आली
एका जाणें गाडिंत दुसऱ्या, गर्दि एक झाली ! ५
उठे भराभर—वळकुटि उचली—उतरे तांतडिनें,
रामराम मग करुनि से बत्या पळे गडबडीनें ! ६

रेल गांठली,—वळकुटि ढकली—गार्दींत तो घुसला!
जागा पटकवि, जीव हायसा होय, सुखें बसला! ७
घटका भरली शिटी वाजतां ढग फूत्कारीत
धापा टाकित, धाडधाड ती रेल सुटे त्वरित! ८
अन्य दिशेनें क्षणार्धांत ती दृष्टिआड झाली!
बघतां बघतां मुशाफिरा त्या घेउनियां गेली! ९
गाडि बदलली, यांत कशाचें भय संकट खेद?
कां मग मरणा भ्यावें न कळे रटोनियां वेद? १०

अजमेर, २३-८-२१

---

## किति महामूर्ख तूं शहाजहां!

[ चाल—कांहींशी 'कर टाक सखे गे या कंठीं' सारखी ]

किति महामूर्ख तूं शहाजहां
गुपित पळपुटें पंजरिं धरण्या
किति उपद्याप रचिलास पहा!—हे शहाजहां! ॥ ध्रु० ॥
हृदयाचें रे कपाट उघडुनि
अमूर्त तें बाहेर आणुनी
पाण्यापरि पैसा रे ओतुनि
तूं मूर्त करिसि, तो ताजचि हा! १
स्वप्न तुझें तें केवळ छाया,
दो दमडीचें त्यास्तव वायां
चुगल बसविला चुगलि कराया
शाहण्या—माणसा सदैव हा! २

इथें काय गाड्या किंकाळुनि
देशाचें रे ओझें वाहुनि
जिवंत राखाति गोऱ्या कंपनि !
कीं हवा तयांस्तव महाल हा ? ३

काय चेतवुनि भटारखाना
गोमांसाचा पकतो खाना !
चोरांच्या भरतो पोटांना ?
आणि का हाडुकें सावां हा ? ४

काय आइचें शव फाडोनी
इथें नसा का गणितो कोणी ?
ज्ञानकणीं का भरतो गोणी ?
रे दिवे दिवे अकलेस अहा ! ५

दरवळोत निरपेक्ष फुलें तीं !
निरभिलाष वाहोत झरे किति !
फुकट चंद्र उधळो निजकांति !
रे अर्थशास्त्रि परि नियम न हा ६

पायतळीं ताजाच्या बसुनी
टकमक पाहो काळ गुंगुनी !
अदमइवाच्या प्रजेकारणीं !
मूर्खा ! दुनिया बाजार पहा ! ७

अजमेर, २५-८-२१

# जीवितसाफल्य !

[ राग–आनंदभैरवी ]

सुफलित झालें—गे सखि जीवित ॥ ध्रु० ॥

युगानुयुग ज्या त्रिभुवनिं शोधीं
निधान तें तव नयानिं मिळालें ! १

जन्मजन्मिंचें क्षुधाव्यथित मन
लाभुनि तुज आकंठचि धालें ! २

कंटकमय या अनंत समयीं
श्रमुनि दमुनि मन सुखीं निमालें ! ३

नयन–द्वारीं शिरुनि गगनिं मन
रवि–शशि–उडुंतुनि अमृतचि प्यालें ! ४

काय भय जरी मरण ये अतां ?
विषवृक्षा फल अमृतचि आलें ! ५

२५-८-२१

## कुठें जिवाचा चोर ?

[ राग—असावरी ]

आज तो कुठें जिवाचा चोर ?
वादळ गर्जे, विजा चमकती
आलि घन-घटा घोर ! ॥ आज० ॥ १
रिम् झिम् रिम् झिम् पाऊस पडे
स्मरास आला जोर ॥ आज० ॥ २
उंच गोखव्यामधुनि दिसे या
सारें काळेंभोर ॥ आज० ॥ ३
लपालें पांखरें ! रानिं एकला
उंच पुकारी मोर ॥ आज० ॥ ४
तटस्थ पानें, तटस्थ रानें
ये राजा जणुं थोर ! ॥ आज० ॥ ५
नाक फुगवुनी, कान उभारुनि
उभें चित्रसें ढोर ! ॥ आज० ॥ ६
टंवकारुनियां पातीं कणसें
कुणास बघति समोर ? ॥ आज० ॥ ७
लीन लयीं कां तया प्रतीक्षति
बांधिन करिं शिरजोर ! ॥ आज० ॥ ८

अजमेर, २८-८-२१

---

# कवणें रूपीं येइल माझ्या घरीं !

[ चाल–लावणीसारखी ]

कुणास ठाउक कवणें रूपीं येइल माझ्या घरीं
कशी तयारी करूं, कशी मी अंगणिं घालूं दरी ?
का वाऱ्यावरि परिमळापरी अवतरेल तो तरी ?
का ढगावरि गर्जनेपरी येइल भूमीवरी ?
काय विजेवरि लखलख येइल जशि सोन्याची सरी ?
नदीपुरावरि येइल का तो तरल तरंगापरी ?
घन राइमधिल का गोड लकीरीपरी ?
का स्मितसा निजल्या बालकपोलावरी ?
का मधुसा फुलल्या कमलदलाभीतरीं ?
यापरि करितां विचार साजणि ! होतें मी घाबरी !
कशी तयारी करूं, कशी मी अंगणिं घालूं दरी ? १
माळ गळां ताऱ्यांची, रविशशि तळपति मुकुटावरी !
कर्णि कुंडलें, प्रभा न मावे साऱ्या भुवनांतरीं !
शंख, चक्र आणि गदा, पद्म हीं झळकति चारी करीं
कोटि मदन ओंवाळा ऐशी छबी शरीरावरी !
शंख शिंग खणखणति, दणाणे चोप नौबदीवरी !
'इतोइतो' ललकार पुढें तो चोपदारही करी !
श्यामकर्ण लखलख रथास खिंकाळती !
दो बाजु चामरें ध्वजा तशा फडकती !
गडगडाट चाले रथहि दिशा कांपती !

यापरि येइल काय दणाणत स्वारी दारावरी ?
कशी तयारी करूं, कशी मी अंगणिं घालूं दरी ? २

तारे सारे डोळे मिटती, सूर्यचंद्र धांवती,
हाहाकारहि करिति दशादिशा, दिग्गज भांबावती,
चळचळ कांपति वारे, सागर जागजागिं गोठती,
जिकडे तिकडे शाइ फांसली ब्रह्मांडाभोंवतीं,
कां सकळ काळिमा घनीभूत जाहली,
अति भयाण, अस्फुट, उंच, रोड साउली
करिं पाश, दंडही महिषावरि बैसली !
शांत शुक्र का यापरि येइल नेण्या तो नोवरी ?
कशी तयारी करूं, कशी मी अंगणिं घालूं दरी ! ३

अजमेर, ३०-८-२१

---

## वैरिण झाली नदी !

[ राग—धनाश्री ]

कशि काळनागिणी !—वैरिण झाली नदी !
पैलतिरावरि प्राणविसांवा
अफाट वाहे नदी ! ॥ १

सुखी मीन हे तरति न गणुनि
लाटा कोट्यावधी ! ॥ २

सुखी पांखरें गात चाललीं
पार वादळीं सुधीं ! ॥ ३
पाषिण खिळलें तिरीं, विरह हा
शस्त्राविणें वधी ॥ ४
पैलतिरिं न कां तृण मी झालें ?
तुडविता तरी पदीं ! ॥ ५
पैलतिरिं न कां कदंब फुललें ?
करिता माळा कधीं ! ॥ ६
घेशिल तें घे मोल नाविका !
पार लाव परि अधीं ! ७

अजमेर, डिसेंबर १९२१

---

## माउली !

[ राग—यमन ]

निजल्या तान्ह्यावरी
माउली दृष्टि सारखी धरी !
तिचा कलीजा पदरीं निजला
जिवापलिकडे जपे त्याजला
कुरवाळुनि चिमण्या राजाला
चुंबी वरचेवरी ॥ १
सटवाई जोखाई हंसविति
खळीं गोड गालांवरि पडती
त्याचीं स्वप्नें बघुनि मधुर तीं
कौतुकते अंतरीं ॥ २

अशीच असशिल त्रिभुवनजननी !
बघत झोंपल्या मज का वरुनी ?
सुखदुःखांचीं स्वप्नें बघुनी
कौतुकशी कां खरी ? ३

अजमेर, डिसेंबर १९२१

---

## सांवळी

[ राग–दुर्गा ]

जन म्हणाति सांवळी तुज सगळे
करुणाई बिचारे ते अंधळे ! ॥ ध्रु० ॥

नवमीची गे रात्र सांवळी,
चंद्रकोर बिजवरा कपाळीं
शालूवरि ताऱ्यांची जाळी !
ज्यां मोहवी न त्यां काय कळे !
जन म्हणति सांवळी तुज सगळे १

त्याच रात्रिंच्या अगाध उदरीं
तेजोनिधि वडव्यापरि सागरिं
प्रगटतांच तो दिशादिशांतरिं
कोंदुनी प्रभा त्रिभुवन उजळे
जन म्हणाति सांवळी तुज सगळे २

अगाध सुंदर यमुना काळी,
तिरीं गर्द झाडांच्या ओळी,
वेडा झाला तो वनमाळी,
उजळिते मनोमळ श्याम जळें
जन म्हणति सांवळी तुज सगळे ! ३

काळा काळा मेघ सुंदरी !
भाग्यहीन जो मोहे न परी
धनधान्याची समृद्धि उदरीं
मरतील बापुडे जरि न वळे !
जन म्हणति सांवळी तुज सगळे ! ४

तरंग झुलती, विचार फुलती,
हास्य अश्रु तव मनिं दरवळती
बाग पैलतिरिं फुले दूर ती !
निजसमयीं सेवूं गोड फळें
जन म्हणति सांवळी तुज सगळे. ५

नील कमलिनी माझी सुंदरि
जन्मजान्मि लाभूं दे मज तरि
कुठुनि पाहतिल मंद पैलतिरिं
दृष्टीच जयांची भरे मळें !
जन म्हणति सांवळी तुज सगळे !

अजमेर, १-२-२२

# कळा ज्या लागल्या जीवा !

[ गजल ]

कळा ज्या लागल्या जीवा मला कीं ईश्वरा ठाव्या
कुणाला काय हो त्यांचें ? कुणाला काय सांगाव्या ?
उरावरि हात ठेवोनी उरांतिल शूल का जाई ?
समुद्रीं चहुंकडे पाणी पिण्याला थेंबही नाहीं !
जनांच्या कोरड्या गप्पा ! असे सारे जगद्वंधु !
धुमाकुळ गर्जनेचा हो, शपथ जरि एक ये बिंदु !
पुढें ही चालली दुथडी नदी नच सेतु नाव हि वा
भुतांची झुंज ही मागें, भडकला चहुंकडे वणवा !
नदी लंघोनि जे गेले, तयांची हांक ये कानीं
इथें हे ओढती मागें मला जखडोनि पाशांनीं !
भयंकर ओढ ही लागे पुढें मागें मनामाजी
तटातट काळिजाचे हे तुटाति तंतु क्षणामाजी
पुढें जाऊं वळूं मागें, करूं मी काय रे देवा !
कुणी घे तोंडसुख, कोणी हंसे, कोणी करी हेवा !

अजमेर, ३०-१-२२

# फेरीवाला

[ राग–यमन ]

" फेऱ्या दारावरी
कुणी हा, फेरीवाला करी !
प्रभातकाळीं दीपविसर्जनीं
सायंकाळीं दीपदर्शनीं
पुकार करितां खिडकीवरुनी
नजर फेंकतो वरी !
कुणी हा फेरीवाला करी !—फेऱ्या दारावरी ! १

पलीकडे वटवृक्षाखालीं
पारंब्यांची ज्याला जाळी
गर्द साउली ज्या कवटाळी
उभा आज तो परी !
कुणी हा फेरीवाला करी !—फेऱ्या दारावरी ! २

कंवराणीजी ! गोखड्यांतुनि
जरा बघा तर हळूच ढुंकुनि
हवा तरी घ्या बुरखा ओढुनि
नजर चळो ना परी !
कुणी हा फेरीवाला करी !—फेऱ्या दारावरी ! ३

किति वीरांनीं सुंदर तरुणी
हरिल्या पूर्वीं शत्रुपुरांतुनि
रसाळ लिहिल्या कथा कवींनीं
किती पुराणांतरीं !
कुणी हा फेरीवाला करी !—फेऱ्या दारावरी !" ४

+ + + +
+ + + +

विशाल त्याचा बळकट बाहू
तरुणि फुलांपरि शकेल वाहूं !
टोळांपरि मग शत्रू येऊ
उडविल माशांपरी !
कुणी हा फेरीवाला करी !—फेऱ्या दारावरी ! ५

नदीपलिकडे त्याची घोडी
टांपा हाणी ! जमीन फोडी !
कशी खिणखिणे तिला न जोडी !
नेइल बिजलीपरी !
कुणी हा फेरीवाला करी !—फेऱ्या दारावरी !" ६

अजमेर, २-२-२२

---

## उडाला पक्षि पिंजऱ्यांतुनी !

[ राग—यमन ]

काय हात चोळुनी ?
उडाला पक्षि पिंजऱ्यांतुनी !
अफाट गगनीं दृष्टी फेंका !
खुशाल मारा हजार हांका !
जीवहि त्याच्या मागें झोंका !
येइल का परतुनी ? ॥ उडाला० ॥ १

डोळे फाडा तोंडें वांसा
रडा पोटभर अथवा हांसा
बाजी आली ! उलटा फांसा
पडला हा कोठुनी ? ॥ उडाला० ॥ २
अनंग कोणी कुमार आला !
हांक मुकी दे कंवराणीला !
जादूचा मग जोर लाविला
भरजरि खिडकींतुनी ! ॥ उडाला० ॥ ३
भक्कम तुमचा महाल सारा !
दारावरिही खडा पहारा !
जनानखान्या कुलुपें बारा !
गेल्या तुरि देउनी ! ॥ उडाला० ॥ ४
अतां वायुवर शस्त्रें हाणा !
खुशाल घ्याहो भाका आणा !
विडाहि उचला तयांस आणा
मर्द तरिच मी गणीं ! ॥ उडाला० ॥ ५
अगाध चक्रव्यूह सुरांचा
झोंपाळा त्यामधिं रागांचा !
खेळ चालला त्यावरि त्यांचा
बघा जरा ढुंकुनी ॥ उडाला० ॥ ६
आकाशांतिल तारे उखडा !
तुरुंगांत वायूला जखडा !
कंवराणीला तेथें पकडा
कोणी वीराग्रणी ! ॥ उडाला० ॥ ७

अजमेर, ३-२-२२

ठाणे वा. क्र. 3548

# दृष्ट हिला लागली !

[ राग—यमनकल्याण ]

दृष्ट हिला लागली—
पडे कुणा पाप्याची साउली !
लिंब-लोण ग कोणी उतरा !
जगदंबेचा ग अंगारा
लावा ! बांधा गंडादोरा !
काळजि घ्या चांगली ! ॥ पडे० ॥ १

चांफ्यापरि गोरेपण पिंवळं
कांकडीपरी अंग कोंवळं,
मैद्यापरि लुसलुशीत सगळं,
दृष्ट पडुनि करपली ! ॥ पडे० ॥ २

ज्यांच्या पोटीं उदंड माया !
लेंकुरवाळ्या आयाबाया
पोक्त शहाण्या आणा दाया
दावा चांफेकळी ! ॥ पडे० ॥ ३

चिमणिसारखं तोंड जाहलं !
डोळ्यावरचं तेज चाललं
नाक उंच वर येउं लागलं !
गत कशि ग जाहली ! ॥ पडे० ॥ ४

विशाळ डोळे लावुंनि वरतीं
चित्रें पाही जशि काकुळती !
मधींच दचकुनि कान देइ ती !
पोर बाइ बहकली ! ॥ पडे० ॥ ५

करकरीत तीनी सांजा ही
देवदर्शना एकलि जाई
वाऱ्यापरि ही अचपळ बाई !
दुष्टें कुणिं पाहिली ! ॥ पडे० ॥ ६

गरिब भोळसर आयाबाया !
खऱ्या दृष्टिची वार्ताहि न यां !
अनुभव घेउनि सारें वाया !
माया खरि आंधळी ! ॥ पडे० ॥ ७

अजमेर, ३-२-२२

---

## मनोमय चित्रें रचिं सुंदरी !

[ राग–यमन ]

विरहीं नानापरी
मनोमय चित्रें रचिं सुंदरी ! ॥ ध्रु० ॥

चित्रकला ती काय बिचारी !
सदा व्यग्र जरि दिसे विचारीं !
तिला जखडती बेड्या भारी !
काय करिल ती तरी ? ॥ मनोमय० ॥ १

अडखळोनियां जड रंगांतुनि
झगडुनियां गे जड कलमांतुनि
चिन्मय हृद्गत ये ठेंचाळुनि
अर्धें मेल्यापरी ॥ मनोमय० ॥ २

मला सुंदरी ! असें न बंधन
ब्रह्मांडांतुनि भरारि मारुन
माधुर्या गे सांठवूनि मन
अर्पीं चित्रांतरीं ! ॥ मनोमय० ॥ ३

उत्कंठेचा गोड रक्तिमा
खुलवि तुझें मुख, तया न उपमा !
प्रभातिंचा त्यापुढें न महिमा !
न ये गुलाबा सरी ! ॥ मनोमय० ॥ ४

स्वप्नभूमिंतिल अगाध माधुरि
चर्मविश्विं का दिसे कुठें तरि ?
भरुनि तुझ्या ती नयनीं अधरीं
चित्र उभें मन करी ! ॥ मनोमय० ॥ ५

हृदयाच्या गे तरंग-रंगीं
शृंगारुनि नवनव्या प्रसंगीं
उभी करुनि मन तुला शुभांगी !
विरह खेद गे हरी ॥ मनोमय० ॥ ६

कधिं रुसतेसी, कधिं हंसतेसी
लेंकरांमधें कधिं रमतेसी
दुःखीं जशि कां पाउस पाडसि
सौख्याचा मजवरी ! ॥ मनोमय० ॥ ७

अजमेर, ७-२-२२.

---

## निष्ठुर !

[ राग–हमीर ]

निष्ठुर किति पुरुषांची जात !
भिरकावित गाईस निसटला हुर्रं करित निमिषांत ! १
रवि सोडुनि माठांत निघालें माहि घेउनि हातांत ! २
वेडि उभी मी लावुनि डोळे वाट बघत दारांत ! ३
नजर एकहि न टाकुनि निसटे सांड जसा नादांत ! ४

ठार करी ! वेताळ वावटळ वितळुनि जणुं वाऱ्यांत ! ५
गाळ्या देता दोन तरी मी जळतें अशि न मनांत ! ६
परि हें निघणें अनोळख्यापरि विळा बाइ पोटांत ! ७
भेट जरा कुंजांत नदीवर घेशिल तृण दांतांत ! ८

अजमेर, ७-२-२२

---

## घट भरा शिगोशिग भरा भरा !

[ राग—कालिंगडा ]

घट भरा शिगोशिग भरा भरा !
वाहुं द्या दयेचा वरुनि झरा !
पुत्रोत्सविं ही प्रसव-वेदना !
विवाह-मंगलिं विरह-यातना !
प्रणयरसोद्गमिं पापकल्पना !
हीं शल्यें सलती हरा ! हरा ! ॥ घट० ॥ १

दिनोद्गमीं रवि-मुखिं घन-रेषा !
पूर्णचंद्रिं लांछन दे क्लेशा !
शुक्रमुखा दे तम परिवेषा !
हीं न्यूनें आतां दूर करा ! ॥ घट० ॥ २

रंग अडविती चित्रभावना !
सूर दुखाविती मधुर गायना !
वर्ण जखडती कोमल कवना !
शृंखळा खिळति या त्वरा करा ! ॥ घट० ॥ ३

ज्योतिर्मय ही सखिची कांती
वाटे कीं मुखावी स्वांतीं !
झोकांडी दे नयेचि हातीं !
ही माया निज संहरा ! हरा ! ॥ घट० ॥ ४

अजमेर, ८-२-२२

---

## रिकामा घट पाहून

[ राग–देस ]

घट तिचा रिकामा झऱ्यावरी !
चुंबिति त्या नाचुनि जळ-लहरी !
अशी कशी ही जादू घडली !
बघतां बघतां कशी हरपली !
का समजुनियां राणी अपुली !
तिस उचलुनि नेई कुणी घरी ? ॥ घट० ॥ १

मिळत चालल्या तीनी सांजा,
दिवसाचा हा धूसर राजा
चंद्रा सोंपुनि अपुल्या काजा
घे निरोप कवळुनि जगा करीं ! ॥ घट० ॥ २

पलीकडे त्या करुनि कापणी
बसल्या बाया हुश्श करोनी,
विनोद करिती रमती हंसुनी !
जा पहा तिथें कुणि ही भ्रमरी ! ॥ घट० ॥ ३

तिथें वडाच्या पाळीभंवतीं
नवसास्तव मृगनयना जमती
कुजबुजुनी गुजगोष्टी हंसती !
रति-मंजरि हेरा तिथें तरी ! ॥ घट० ॥ ४

तांदुळ पदरीं बिल्वदळ करीं,
चरण क्षाळुनि जवळ तळ्यावरि
जमति शिवालयिं पोक्त सुंदरी
हिरकणी बघा ही त्यांत तरी ! ॥ घट० ॥ ५

पलीकडे वेळूंची जाळी
तेथें वारा धुडगुस घाली,
शीळ गोड ती मधुनि निघाली,
ही झुळुक हरपली लकिरिपरी ! ॥ घट० ॥ ६

अजमेर, २५-२-२२

---

# अजि पुनवेची शारदि रात !

[ गर्भा ]

अजि पुनवेची शारदि रात !
झिंगत आला तारानाथ !
जमल्या सुखारिणि या चांदण्या
चंद्राभोंवतिं कीं नाचण्या,
फेर धरिति या गाउनि आज
लखलख चमकति लेवुनि साज,
अंगणिं भरला वरि आनंद
लीला मचली अंदाधुंद !
गवळिणि जमल्या कुरणीं आज
मुरली घुमवा या महाराज !
शरदाचा हा मादक काळ
अंगीं आला ! या गोपाळ !
गाणीं गाऊं घेउनि फेर
मोर-मुकुट शिरिं या बाहेर !
धवल पिठापरि यमुनातीर
लहरी नाचुनि गाई नीर !
खिदळे वारा हा कुंजांत,
डुलती र या गाई आंत
विखरी परिमळ हा कुरणांत
मंद संचरे दाहि दिशांत,
चंचळ चरणीं नाचूं आज
मुरली घुमवा या महाराज !

अजमेर, १६-२-२१

———

## कवणे मुलखा जाशी ?

[ राग—ललत ]

कवणे मुलखा जाशी ?—गे तूं
भार शिरावर
अपार सागर
फुटकी नाव जराशी !—गे तूं कवणे० १
जनक जननि ते
तुझे कवण ते ?
कोठिल तूं रहिवासी ?—गे तूं कवणे० २
कुठें वतन तें ?
कुठें सदन तें ?
मळे खळ्यांच्या राशी ?—गे तूं कवणे० ३
वायु झराझर
आळवि सुस्वर !
ओढि तुझ्या पदरासी—गे तूं कवणे० ४
सूर्याचे कर
धरुनि तुझे कर
आर्जविती रहाण्यासी !—गे तूं कवणे० ५
या जळलहरी
येथिल सुंदरि !
आळविती चरणासी !—गे तूं कवणे० ६

माझें तें घर
तुझें गडे कर
लावुनि ऊर उराशीं!—गे तूं कवणे॰ ७
माझें काळिज
गाउनि निज गुज
निजविल श्रांत मनासी—गे तूं कवणे॰ ८
साहस न करीं
अथांग सागरिं
एकलि अशी प्रवासीं—गे तूं कवणे॰ ९

**अजमेर, २२-२-२२**

---

## रतलें परपुरुषाशीं !

[ राग—ललत ]

रतलें परपुरुषाशीं—रे मी—
मधुर मुरलिसुर
हलवुनि थरथर
ओढिति या चरणांसी!—रे मी—
रतलें परपुरुषाशीं ! १
पैलतिरावर
कुंज मनोहर
माझी तेथ मिराशी २

भिकार सागर
गर्जो भेसुर !
पुसतें कोण तयासी ? ३

प्रबल कुसुमशर
उचलि परांवर
नेइल पैलतिरासी ! ४

तरंग मनिं किति
झुलुका ढकलिति
उत्कंठा शीडासी ! ५

चंचळ उर जरि
चळलें सांवरि,
रतिं आंवळुनि तयासी ! ६

पर चुंबन- मधु
पिउनि पुसति वधु
का शिळपट नवऱ्यासी ? ७

लज्जा भीती
घोळुनि प्रीती
रमती ज्या परपाशीं ! ८

जडलें मन जर
परपुरुषांवर
भान न मग शरिरासी ! ९

अजमेर, १४-२-२२

———

# हिंदु विधवेचें मन !

[ राग–पीलु ]

सांगुं तुम्हांला किती दयाळा ?
न घडे त्याचें नांव कशाला ?
पतित, दीन मज पाहुनि दुर्भग
कळवळलें उर सागर तें मग,
साहासिं सजला लाथाळुनि जग
उदारपण कां न दिसे मजला ? १

निःस्वार्थाचा कळसचि वाहुनि
यज्ञिं सुखाची आहुति देउनि
पापिणीला मज पुसतां विनवुनि
उत्तर देऊं काय तुम्हांला ? २

चराचरांचीं मिथुनें जगतीं
सहवासानें केवळ जगती
कळे मला ही ! काय परि गति ?
भ्रमण भुतापरि आलें भाला ? ३

नीरस वेलिस फुलें उमलती,
खिन्न नभाला तारे भेटतिं
रिक्त सरोवरिं कमळें फुलती
कां मज कथितां हें विधवेला ? ४

अमरें मजवर दार लोटतां
मर्त्य तुम्ही तें उघडूं झटतां !
सुखमंदिरिं त्या नेण्या झुरतां
दयाघना कशि फेडुं ऋणाला ? ५

पतित, बहिष्कृत अस्पृश्यापरि
धिरव्या घ्याव्या मीं बाहेरी !
दया करा, जा आंत तुम्ही तरि
घेउनि कुणि अनुरूप सखीला ! ६

भगिनी होइन, दासी होइन,
भक्त होउनी चरणां पूजिन !
तुमच्या वाटा केशीं झाडिन !
अधिक पत्निपणिं काय कृपाळा ? ७

बोल न बोला एकहि यावर !
धैर्याचे हो ढळतिल डोंगर !
भलतें जाइल निघोनि उत्तर !
भागिदार व्हा नच नरकाला ! ८

औदार्यास्तव त्या रात्रंदिन
आळवूनि मी हरिला विनाविन !
अभद्र माझ्या मलिन कराहुन
श्रेयस्कर कर देउ तुम्हांला ! ९

अजमेर, २-४-२२

---

# दे पूर्ण हृदय सुंदरी !

[ राग–भैरवी ]

देसि मला तूं जरी—तरी दे—
पूर्ण हृदय सुंदरी ! ॥ ध्रु० ॥

जरी कोंपरा ठेविसि राखुनि
चोर तिथें गे शिरतिल लपुनी
घालतील गे छापे तेथुनि
रतिसाम्राज्यावरी !—तरी दे—॥ पूर्ण० ॥ १

दुधामध्यें गे थेंब विषाचा
सुखसंभव गे तेथ कशाचा ?
मार्ग सरळ तो मग नाशाचा !
दूध विषच हो तरी—तरी दे—॥ पूर्ण० ॥ २

तार सतारिस सैल एक गे
संगीताचें नांवहि नलगे !
सोंग ढोंग बाहेरिल अवघें
समज फुकाचे परी !—तरी दे—॥ पूर्ण० ॥ ३

कुभावनेनें विटाळतां मन
प्रीती जाइल पळून तेथुन
विषमय होइल सारें जीवन !
मरण बरें किततरी—तरी दे —॥ पूर्ण० ॥ ४

अजमेर, ६-४-२२

+ + + + +
+ + + + +

## बलोद्धतांस !

[ राग–मालकंस ]

उखळांत दिलें शिर ! काय अतां ?
दणकवा मुसळ ढोंग न करितां ! ॥ध्रु०॥

दुबळ्यांचें बळ केवळ दुस्तर,
करील कैसें दिव्य भयंकर !
बलोद्धतांची मोडिल कंबर !
पाहुं द्या जरा चकिता जगता ! १

माय ! तुझा तो चिलया बाळा !
विसरुं कसा ? कांडितां तयाला
अश्रुबिंदु त्या एक न आला
बांधिलें अनंता बलवंता ! २

प्रल्हादाहि सत्याग्रह-रत तो
आइ ! आठवे सदैव सुत तो !
ढळे न तिळभर छळीं अमित तो !
पशु करुनि सोडिलें भगवंता ! ३

सदा अहिंसारत सत्याग्रहि
हरिश्चंद्रसुत अतुल निग्रही
अजस्र मारा रिपुचा साही
परि आणी हरिला मानवता ! ४

ह्या बाळांचा आत्मा पसरे
युगांतरीं, तो आतां उतरे
एकवटुनि 'मोहनीं' अवतरे !
तूं वांझ न गे माझी माता ! ५

अजमेर, १३-४-२२

---

## अंगाईगीत

[ चाल—चारा सोडुनियां ]

जो जो जो जो रे !
घरटीं तीं
फांद्यांमधुनी झुलती
निजले चिउ काऊ !
निजवीती
झुलुका गाउनि गीती
गाणीं किति गाऊं ? ॥ जो० ॥ १

हम्मा ही
दूदू देउनि पाही
निजल्या गोठ्यांत !
रे छबिल्या
राघू मैना निजल्या
अपुल्या पिंजऱ्यांत ! ॥ जो० ॥ २

या वेळीं
निजलीं झाडें वेली !
निजला चांदोबा !
रात्र किती
चढली काळी भंवतीं
आला बागुल बा ! ॥ जो० ॥ ३

शुक गडे !
झालें जिकडे तिकडे !
झोंप न तुज बाळा !
खिंदळशी
खुदु खुदु खुदु खुदु हंससी
एकच हा चाळा ! ॥ जो० ॥ ४

लडिवाळा !
रुणुझुणु घुंगुरवाळा
पायीं वाजविशी !
काशि बाळा
झोंप शिवेना डोळां !
अफु आली तुजशीं ॥ जो० ॥ ५

सटवाई !
षष्ठिदेवि जोखाई !
सांभाळा याला !
न शिवो तें
पाप अमंगल भलतें !
माझ्या छबिल्याला ! ॥ जो० ॥ ६

अजमेर, २-५-२२

---

## समजुनि बांध शिदोरी !

[ राग–ललत ]

सहचरी ! समजुनि बांध शिदोरी !
आवडनावड राख बाजुला
बघ मार्गाची दूरी ॥ सहचरी० ॥ १
गोड करंजा खाजीं वासति
बुरसे गे सांटोरी ॥ सहचरी ॥ २
ऊर्मी कार्यीं धीवरलाडू
मार्गीं न त्यांची थोरी ॥ सहचरी० ॥ ३
पोहे, सत्तू, पीठ, फुटाणे,
वाट काटतिल सारी ॥ सहचरी० ॥ ४
मार्गीं मिळे कीं न मिळे पोई
असुं दे तांब्या दोरी ॥ सहचरी० ॥ ५
हरिनामाची गांठ घाल मग
न घडे मार्गीं चोरी ॥ सहचरी० ॥ ६

अजमेर, १-८-२२

---

ग्रंथ संग्रहालय

## अशांचें कोण करिल तरि काय !

[ राग—बिहाग ]

अशांचें कोण करिल तरि काय ? ॥ ध्रु० ॥

वस्त्र हवें ज्या लाज झांकण्या
अन्न ढकलण्या काय ॥ अशांचें० ॥ १

रडति न ज्यांचीं रांडापोरें
दिवे घनाचि न हाय ! ॥ अशांचें० ॥ २

दिली तिलांजलि शरिरसुखावरि
काय अशांस अपाय ! ॥ अशांचें० ॥ ३

खुशाल घाला अशां तुरुंगीं
काय अशांचें जाय ? ॥ अशांचें० ॥ ४

भीतिल का चतुरंग-बल-नृपा
दिला मृत्युशिरिं पाय ! ॥ अशांचें० ॥ ५

'जनीं जनार्दन' ही हरिसेवा
अन्य न ज्यां व्यवसाय ! ॥ अशांचें० ॥ ६

अशां विलोकी वक्र कुणाची
अशी वियाली माय ? ॥ अशांचें० ॥ ७

दीन जनांची एक काळजी
मनीं दुजीस न ठाय ! ॥ अशांचें० ॥ ८

धन्य तुझा गे कुसवा माते !
दैन्य न कां मग जाय ? ॥ अशांचें० ॥ ९

अजमेर, ८-८-२२

---

# कोण रोधील ?

[ झंपा—भूप राग ]

या भविष्याचिया दिव्य कारागिरा
कोण रोधील दे कोण कर सागरा ? ॥ ध्रु० ॥
शूल राजा ! तुझा रक्त त्यांचें पिवो !
गृध्रगण भक्षण्या पुण्य गात्रां शिवो !
दुर्गीं त्यांचीं शिरें अधम कुणि लोंबवो !
अंत समजूं नको हा नृपा पामरा ! ॥ या० ॥ १
ज्योति मृत्युंजया प्रबळ पिंडाहुनी
समज वडवाग्निशा चहुंकडे पेटुनी
देशकालासि रे टाकितिल व्यापुनी
अंतिं फडकेल रे ध्वज तयांचा खरा ! ॥ या० ॥ २
ज्यावरी भार तव, ज्यावरी गर्व तव,
विफल तोफा तुझ्या पलटणी सर्व तव !
विफल बल दर्प तव, यांत का शर्व तव ?
उघड लोचन पहा दूर राजा जरा !— ॥ या० ॥ ३
भव्य ते स्तंभ बघ, तुंग अट्टालिका
त्या कमानी पहा, त्या गवाक्षादिकां,
सौध ते कळस तो सोनियाचा निका
ध्वज वरी प्रीतिचा मोहवी भास्करा ! ॥ या० ॥ ४
तेथ त्या रत्नमय दिव्य सिंहासनीं
लखलखे भरतभूजननि बघ विजयिनी !
प्रणय नय सत्य हे सज्ज गण रक्षणीं
बघ भविष्याचिया दिव्य त्या मंदिरा ! ॥ या० ॥ ५

अजमेर, १८-८-२२

---

# अब तुम जयजयकार करो !

[ राग–बिहाग ]

अब तुम जयजयकार करो !
दुर्गम परवत आडो ठाडो
तामें द्वार परो ! ॥अब०॥ १
द्वारे ठाडो वीर महात्मा
नेन सनेह भरो ! अब०॥ २
कमर बांध कलजुग ललकारो
डरपत भाग परो ! ॥ अब०॥ ३
हाय पडी अब कलजुग-दलमो
तासे कोन लरो ? ॥ अब०॥ ४
याहि काज नरसिंह पधारे
हरनाकुस मरो ॥ अब०॥ ५
याहि काज दसरथसुत जाये
बंदर सरग चढो ॥ अब०॥ ६
याहि काज बामन बटु आये
बलि पाताल धरो ॥अब०॥ ७
वोहि पधारे 'मोहन' प्यारे
अब दुख दरद टरो ॥अब०॥ ८
आवो आवो अब सब भैय्या
काहूसे न डरो ! ॥ अब०॥ ९
मुसलमान, द्विज, सूद्र, आव सब
बाह पसार खडो ! ॥ अब०॥ १०

अजमेर, २६-८-२२

---

# प्रतिज्ञा

[ राग—मालकंस ]

धुळीलाहि जाऊं मिळोनी सुखें
घरालाहि होऊं सुखें पारखे
उपाशीं मरूं दूर देशांतरीं
वनीं रानिं हिंडूं पिशाचापरी
सुळाच्या अती तीव्र धारेवरी
हंसोनी सजूं रक्तपुष्पापरी
असत्या तुझा हा न माथा झुके
जरी कापशी काप येई सुखें
जुल्मा न दे अंगुली हात हा
कलम् कर सुखें आण चाकू पहा !
असे दोगला दो पित्याचा तरी
फसे ऐंद्रजालीं तुझ्या यावरी !
फिरूं नागवे होउनी वानरें
विषारी तुझे ते दुशाले पुरे
तुझ्या त्या महालां, विलासां भुले
महा रौरवीं घोर नर्की गळे !
नको स्पर्श हा दुष्ट माये ! अगे
भुतासारखा मोह आतां निघे !

अजमेर, २६-९-२२

## वसंत फेरीवाला !

[ राग—देस ]

आला हा दारिं उभा, वसंत फेरीवाला !
पोतें खांद्यावरि सौद्याचें देइल ज्याचें त्याला ! ॥ध्रु०॥
कुणीं लाविलें गुलाब बेला घर न पुरे वासाला ! ॥आला०॥ १
कुणीं पेरिले अंगणिं कांटे, वाव न पद देण्याला ॥आला०॥ २
कुणीं पेरिले पेरू आंबे, वाण न माधुर्याला ॥आला०॥ ३
कुणीं लाविल्या बोरी बाभळि हाणिति कर कर्माला ॥आला०॥ ४
चोख दयाळू, फेरीवाला, त्याला दोष कशाला ? ॥आला०॥ ५
लावुनि पालवि फुलवुनि खुलवुनि, देइ परत कांस्याला !॥आ०॥ ६
दाम तसा घ्या माल मोजुनी, बोल इथें कोणाला ? ॥आ०॥ ७

अजमेर, ५-११-२२

---

## जेव्हां लोचन हे तुझे विहरती या माझिया लोचनीं

स्वनित

जेव्हां लोचन हे तुझे विहरती या माझिया लोचनीं !
तेव्हां ज्योति झळाळते जिवलगे ! सौंदर्यसीमाच ती !
वर्णाया तरि वर्ण आणुं कुठुनी ? कुंठेच माझी मति
राही मूक उभा गती नच अतां वाचाळतेलागुनी !

कैसी मी लपवूं, कुठें छिपवुं ही रम्याकृतींची खनी ?
हें माझें पडकें भिकार घरटें, या चोरही घेरिती,
ठेवूं मी हृदयांतरीं तरि तया कांटे अतां व्यापिती
कोठें ठेवुं तरी सुरक्षित हिला कालाचियापासुनी ?
बाणीचें बनवीन मंदिर तरी सौभाग्य तें कोठुनी
जें लाभे कविला तया यम जया कांपे सदा निर्दय
रंगीं रंगुनि जो रची सुकविता मंजूषिका वाङ्मय
त्याला ये लपवावया निज सखी ! आशा वृथा मन्मनीं !
आतां दीनदयाघना ! चरणिं रे ही एकचि प्रार्थना
नेतां पुण्यमयी प्रिया तिजसवें ने पातकी या जना !
अजमेर, ७-१२-२२

---

## तूं कवण जगांतील ललना !

[ राग—ललत ]

तूं कवण जगांतील ललना ॥ ध्रु० ॥
बाणकल्पनासृष्टींतुन का अवतरलिस या भुवना १
गंधर्वांच्या सुरसृष्टीमाधिं पावलीस का जनना २
का नंदनवनकुसुम पातलिस रिझवाया मम नयना ३
सुरजान्हविंतिल कमलगंध का मूर्त येसि मम सदना ४

आनंदच का शरीर धरुनी आलिस विहसितवदना ५
येइं करीं पावन या सदना लावुनि कोमल चरणा ६
स्थिरावले हे लोचन पडली भुरळ बघुनि तव नयनां ७
चंद्रकिरणमय सुहसित स्रवुनी उजळो या मम भुवना ८
बहु रत्नांची जननि जागवी हृदयगुहागत कवना ९

अजमेर, २२-१-२३

---

## भूपाळी !

रुणु झुणु ये रुणु झुणु ये झणकारित वाळा !
लुठु लुठु लुठु दुडु दुडु दुडु ठुमकत ये बाळा ! ॥धु०॥

धुंदि अजुनि रजनि-नयनिं
सांवरुनी, पदर धरुनि
शुभवदना
उडु-रदना
देइ जांभयांला ! ॥ रुणु० ॥ १

दिग्ललना धौतमुखी
रत्नदीप कनकतबकिं
घेउनियां
वाहति या
बालभास्कराला ! ॥ रुणु० ॥ २

कांकडआरति करिती
देवगृहीं नव युवती
आळविती
जागविती
नंद-नंदनाला ! ३
रजनि-तनय मारुत-गण
नृत्य करिति चपल चरण
तोम् तननन
झूम् झननन
करिति गायनाला ! ॥ रुणु० ॥ ४

जागति बघ चिउ काऊ
लागति घरट्यांत गाउं
डोलति तरु
लागति करुं
श्रीहरि—भजनाला ! ॥ रुणु० ॥ ५

जागति गोठ्यांत गाइ
धाजति वत्सांस धाहिं
ये, रांगें,
कळ लागे
माझिया स्तनांला ! ॥ रुणु० ॥ ६

अजमेर, २४-१-२३

———

## मान न करिं गे !

[ राग–भूप ]

समज ! मानिनी, मान न करिं गे ! ॥ ध्रु० ॥
झळक चपल ही व्ययार्थ हीस्तव
प्रणयाचा अपमान न करिं गे ॥ समज० ॥ १
अमृत–मधुर-रस-पान हवें तरि
अधर–रसाचें दानच करिं गे ॥ समज० ॥ २
मधुमय कोमल कमल, कमलमुखि !
मधु–दानीं अनमान न करिं गे ॥ समज !० ॥ ३
चंद्रमुखी ! हा चंद्र कांतिमय
कांतिदानिं अभिमान न करिं गे ॥ समज !० ॥ ४
अधर-माधुरी-विषयिं कृपणपण
नियति-विमुख कृति जाण न करिं गे ॥ समज !० ॥ ५
शरिरभोग हे भोगुनि सरती
सत्क्षण सुमुखि ! उत्थान न करिं गे ॥ समज !० ॥ ६

अजमेर, जानेवारी १९२३

———

# उडाला हंस! न येइल हाता!

[ राग–जोगी ]

उडाला हंस! न येइल हाता!
कां रे तळमळ करितां आतां? ॥ ध्रु० ॥

अनन्त निर्मळ गगन-नीलिमा
येइ न हातीं धरितां
त्यांत निसटुनी घेत भरारी
वितळे बघतां बघतां ॥ उडाला० ॥ १

रत्न-खचित हा सुवर्ण-पंजर
त्यांत लोभुनी फसतां
रमुनि रमविलें! परि न गुंतला
तटका तोडुनि जातां ॥ उडाला० ॥ २

भक्कम तुमचा पंजर बळकट
दार जखडलें असतां
निघे, तयारी कडेकोट ही
जुमानिली नच निघतां! ॥ उडाला० ॥ ३

मोत्याचा चारियला दाणा,
प्राणाहुनि या जपतां
निघे लावुनि चटका! कोठें—
तुमची माया ममता? ॥ उडाला० ॥ ४

रमला-झुलला-फुलला-खुलला
मनगटावरि डुलतां !
कां मग तांताडि तीरसा सुटे
टाकुनि पंजर उडतां ? ॥ उडाला० ॥ ५

कुणीं दिली या हांक ? कोठुनी
कानीं येउनि पडतां
हा तडफडला ! हा फडफडला !
निघे निरोप न घेतां ! ॥ उडाला० ॥ ६

पूर्व वनांतिल रव परिचित का
कानीं याच्या येतां
होउनि जागी स्मृति, खडबडुनी
निघे न कांहीं बघतां ॥ उडाला० ॥ ७

मधुर रवें हा पंजर घुमतां
मोहवि साऱ्या जगता !
सुना, रिकामा, मुका तिडिक दे
नयनां आतां बघतां ॥ उडाला० ॥ ८

कां रे डोळे फाडुनि बघतां ?
कां रे ऊर बडवितां ?
कां तळमळतां कां हळहळतां ?
आतां न फिरे परता ! ! ॥ उडाला० ॥ ९

ग्वाल्हेर, १-४-२३

---

# बिनती सुनो आज

[ राग–असावरी ]

बिनती सुनो आज
त्रिभुवनके महाराज !
बेर भई टेर टेर बैठ गयो अब अवाज ! ॥ बिनती० ॥ १

तुम गरीब के निवाज
गरिबन की तुम्हे लाज
गरिबनघर पीर परे, और करे कोन काज ? ॥ बिनती० ॥ २

परधर्मी हात राज
धर्मी जन को समाज
त्राहि त्राहि टेर रहो ! कवन दूसरो इलाज ? ॥ बिनती० ॥ ३

खाबन को नहि नाज
चीर न ढांकनकुं लाज
अबहू तो बचन सुमिर आव, अन्य काज त्याज ॥ बिनती० ॥ ४

ग्वाल्हेर, ऑगस्ट १९२३.

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ...

+ + + + + +
+ + + + + +

## राधा झूलत माधवसंग

[ राग–बिहाग ]

राधा झूलत माधवसंग !

जमना तट तरु सुमन रेशमी झूलो लाल सुरंग ॥ राधा० ॥ १

गगनबीच घन माधव राधा बिजली लिपटी अंग ॥ राधा० ॥ २

गात गीत शृंगार-रस भरे झलकत नादतरंग ॥ राधा० ॥ ३

माधवजी के अंगसंगसे जागे हृदय–अनंग ॥ राधा० ॥ ४

अंग अंग भये पुलकित मुखपे गहेरे छाये रंग ॥ राधा० ॥ ५

अर्धनिमीलित नयन मदभरें चितवत हरिमुख दंग ॥ राधा० ॥ ६

---

## निर्धार

[ राग–जोगी ]

नदितीरिं उभी ती दाट तृणीं
आर्द्र वस्त्र ठिबके चरणीं ! ॥ ध्रु० ॥

नयन नभीं, कर दोन्ही जुळले
केशपाश उरिं पाठीं रुळले
तुफान हृदयीं घोर उसळलें
पसरे छाया मुखिं नयनीं ॥ नदि० ॥ १

बघति तुंग गिरि घेरा घालुनि
थिजले तरुवर तिला पाहुनी
स्थिरावले ढग पळतां गगनीं
डोकावि बालरवि ढगांतुनी ॥ नदि० ॥ २

असह्य छळ ज्यांस्तव सोशियला
तेच निघाले टाकुन मजला
नभ कोसळलें ! हाय कपाळा !
परि दुभंगे न देवा ! धरणी ॥ नदि० ॥ ३

कोण कुणाचें जगतीं देवा
कोण दीर रे ! कोण सासवा
कुठला मायेचा ओलावा
गांजिलें भाजिलें दिनरजनी ! ॥ नदि० ॥ ४

म्हणति मींच कीं त्यांना गिळिलें
करंटीच अवदसा जन्मलें
खरेंच का हें देवा सगळें ?
मग नको दाविणें मुख फिरुनी ॥ नदि० ॥ ५

डोईवर 'चिमण्यां'ची पाटी
पैसा अडका एक न गांठीं
कोण पृथ्विच्या अफाट पाठीं
मग काय करिन तरि मी जगुनी ॥ नदि० ॥ ६

पिलें अर्पितें तुझिया चरणां
दयाघना तुज त्यांची करुणा
फुटेल पान्हा तुजविण कवणा
त्यां तूंच माय, तूं बाप जनीं ॥ नदि० ॥ ७

मायपोट तूं गंगामाई
अगाध माया तुझिया ठायीं
आल्यें धांवत तुझिया पायीं
दे ठाव तुझ्या डोहीं गहनीं ॥ नदि० ॥ ८

तुझा डोह मज महाल आई
मऊ बिछोना तव तळ बाई
करिल तुझा ध्वनि मज अंगाई
किति शांत झोंप येइल मरणीं ॥ नदि० ॥ ९

उडी घालण्या टाकी चरणा
विदारुनी तों वातावरणा
हंबरडा आला तो श्रवणा
'आइ आइ' जासी त्यजुनी ॥ नदि० ॥ १०

ऐकुनि कीं व्याकुळ ती झाली
मटकन माउलि बसली खालीं
निश्चय ढळला तो तत्कालीं
हो हृदयाचें पाणी पाणी ॥ नदि० ॥ ११

घे ओढुनि पोटीं वत्साला
मोलमजूरी करीन बाळा
भिक्षा मागिन रे वेल्हाळा
परि भरीन हीं तोंडें चिमणीं ।। नदि० ।। १२

ग्वाल्हेर, २३-८-२६

---

## ते कांत यापुढें, मीहि तयांची कांता !

[ बारामाशीची चाल ]

कुणि कसें म्हणा, कुणि करा हवें तें आतां
ते कांत यापुढें, मीहि तयांची कांता
कुणि म्हणाच पापिण म्हणाच कुलटा आतां
तो एक जाणतो मला माझिया नाथां
कुणि म्हणा भाळलें वृथा बाह्यरूपाला
कुणि म्हणा जाहलें बळि मी तारुण्याला
कुणि म्हणा सोडिली लाज सांडिली माया
कुणि म्हणा टाकिली भीति, दूषिली काया
कुणि म्हणा लाविला कलंक कुलशीलाला
कुणि म्हणा फांसलें काळें चारित्र्याला
कुणि म्हणा लाविली हरताळचि शास्त्रांला
तो जुल्म तुमचा आग लागुंदे त्याला
कुणि म्हणा टाकिला धर्म टाकिली रीती
कुणि म्हणा टाकिला देव टाकिली नीती
जग रुसोच रुसलें, रुसो न परि तो त्राता ।। ते० ।। १

कुणि म्हणाच मारूं, म्हणा छळूं दोघांला
कुणि म्हणाच लावूं आग घरादाराला
कुणि म्हणा पेटवूं वैरहि साधूं दावा
कुणि म्हणा साधुनी संधी घालूं घावा
घ्या हातिं पाजळुनि हवी तशी तरवार
घ्या घडा तुटोनी करा हवे ते वार
त्या दयाघनाची करुणा चिलखत भारी
ह्या सत्प्रीतीवर बोथटतिल तरवारी
आकाश कोसळो उलो पृथ्वि या काळीं
जी गोष्ट झालि ती आतां झाली ! झाली !
मज मरण येउ, हरि सुखी राख परि नाथा ॥ ते० ॥ २
कुणि कसेंहि समजो, करोहि छळ या काळीं
कुणि गांजो भाजो अमुचाही हरि वाली !
प्रति तुम्हींच निजपादिं हरी जरी बोलविले
तरि भ्रतार दुसरे तुम्हींच ना अर्पियले
आज्ञेविण तुमच्या हलेल का हो पान ?
मायेविण तुमच्या जगेल का हो कोण ?
तुम्हि सर्वसाक्ष मग म्हणोच जग हें कांहीं
तुम्हि होय म्हणा शास्त्रांची पर्वा नाहीं
मज माझें काळिज देतें देवा ! ग्वाही
निष्पाप असें मी, कुणी म्हणों दे कांहीं
मग लाज तुम्हांला दीन जनांच्या नाथा ! ॥ ते० ॥ ३

ग्वाल्हेर, १३-९-२६

---

# तुम्ही उतरतां !

[ चाल–'अर्पिलें सुमन तें' सारखी ]

वाटलें नाथ हो ! तुम्ही उतरतां खालीं !
दे असहकारिता हांक तुम्हां ज्या कालीं ! ॥ ध्रु० ॥

हंबरडा फोडी आर्त महात्मा जेव्हां
आघात झेलिले घोर उरावर तेव्हां
त्या यशें द्रवुनी गमे धांवला देवा
ऐकिली आर्त किंकाळी ! ॥ वाटलें० ॥ १

वाटलें उघडलीं द्वारें तीं स्वर्गांचीं
वाटलें धांवली माउलि ती गरिबांची
वाटलें पळाली सकळ संकटें साचीं
गरिबांचा आला वाली ! ॥ वाटलें० ॥ २

घेतली धांव हो तुम्हीं द्रौपदीसाठीं
गरिबांस्तव धरिली तुम्हीं कांबळी काठी
गुरगुरलां होउनि पशुहि गांजल्या पाठीं
ती वेळ वाटलें आली ! ॥ वाटलें० ॥ ३

परि हाय कोणतें पाप आडवें आलें ?
हा कपाळ फुटलें संचित तें ओढवलें
परतली माउली, स्वार्थानें अडवीलें
आशेची माती झाली ॥ वाटलें० ॥ ४

हा दुणावला हो घोर अतां अंधार
ह्या दिशा करिति हो भयाण हाहाकार
जखडती पाश हो अतां अधिक अनिवार
हा हाय ! गति कशी झाली ! ॥ वाटलें० ॥ ५

ग्वाल्हेर, ३१-३-२७

## तुझी हालचाल !

[ राग–भैरवी ]

सहज तुझी हालचाल मंत्रें जणुं मोहते ! ॥ ध्रु० ॥

सहज चालणेंहि तुझें
सहज बोलणेंहि तुझें
सहज पाहणेंहि तुझें
मोहनि मज घालितें ॥ सहज० ॥ १

संसृतिचा घोर भार
बघतां तूं एकवार
विलया सखि ! जाइ पार !
देहभान लोपतें ॥ सहज० ॥ २

देवी ! वनदेवि म्हणूं
स्वप्न, भास काय म्हणूं
प्रतिभा कीं भैरवि म्हणुं
मति माझी कुंठते ॥ सहज० ॥ ३

एकवार बघ हांसुन
डळमळेल सिंहासन !
तळमळतिल मनिं सुरगण
हास्यास्तव खास ते ॥ सहज० ॥ ४

ही अपूर्वशक्ति सगुण
झाडितसे मम अंगण
हें माझें भाग्य बघुन
जळफळतिल देव ते ॥ सहज० ॥ ५

ग्वाल्हेर, ३-४-२७

## तुझे लोचन !

[ राग–दरबारी कानडा ]

अगाध दुर्मिळ जनीं
दिसे मज कांहिं तुझ्या लोचनीं ॥ ध्रु० ॥
ह्या डोळ्यांच्या खिडक्यांभीतरिं
अफाट अनुपम दिसे माधुरी
प्रिये ! जिवलगे ! काळिज त्यावरि
टाकिन कुरवंडुनी ॥ दिसे० ॥ १
अथांग भरला अपार सागर
हेलकावतो अगाध सुंदर
नाचति रविकर जळलहरींवर
कांपे मन पाहुनी ॥ दिसे० ॥ २
अफाट निर्मळ आभाळांतुनि
तारे डौलें निघति पलटणी
तालसुरावर नियमित चरणीं
जणुं तंबुर ऐकुनी ॥ दिसे० ॥ ३
मूर्तिमंत जणुं रागरागिणी
रंगुनि गेल्या गोड गायनीं
नाग, हरिण, सुरतरुणि, यक्षिणी
डुलति सखे परिसुनी ॥ दिसे० ॥ ४
मदनाचा कुणि तरुणि पाळणा
हालवि गाउनि दिव्य गायना
जादूची का ही गे रचना
कीं भासचि हा मनीं ? ॥ दिसे० ॥ ५

अजमेर, ८-२-२२

## घन तमीं शुक्र बघ राज्य करी !

[ राग—भैरवी ]

घन तमीं शुक्र बघ राज्य करी !
रे खिन्न मना ! बघ जरा तरी ! ॥ ध्रु० ॥
ये बाहेरी अंडें फोडुनि
शुद्ध मोकळ्या वातावरणीं
कां गुदमरसी आंतच कुढुनी !
रे ! मार भरारी जरा वरी ! ॥ घन० ॥ १
प्रसवे अवस सुवर्णा अरुणा !
उषा प्रसवते अनंतकिरणा !
पहा कशी ही वाहे करुणा !
कां बागुल तूं रचितोस घरीं ? ॥ घन० ॥ २
फूल हंसे कांट्यांत बघ कसें !
काळ्या ढगीं बघ तेज रसरसे !
तीव्र हिमांतरिं वसंतहि हंसे !
रे ! उघड नयन ! कळ पळे दुरी ! ॥ घन० ॥ ३
फूल गळे ! फळ गोड जाहलें !
बीज नुरे ! डौलांत तरु डुले !
तेल जळे ! बघ जोत पाजळे !
का मरणीं अमरता ही न खरी ? ॥ घन० ॥ ४
मना ! वृथा कां भीसी मरणा ?
दार सुखाचें तें ! हरि-करुणा !
आई ! पाही वाट रे मना !
पसरोनि बाहु कवळण्या उरीं ! ॥ घन० ॥ ५

इंदूर, २९-१०-२०

# आरती

[ चाल—आरती भुवनसुंदराची ]

आरती त्रिभुवनजनकांची !
अर्धनर–नारि-नटेशाची !
झळके पुरुष अर्धभागीं !
लखलखे नारी अर्धांगी !
सीमा ऐक्याची संगीं !
कोटि रतिमदन
मनोरम वदन
लाजतिल बघुन !
खपेना आड शरीरांची !
जय जय सान्तअनंतांची ! ॥ आरती० ॥ १

अपर्णा तुजविण नीरस ती !
प्रस्तर पार्वतीच गमती !
ज्योतिविण दिवटी मग नुसती !
तूंहि तिजविण
शरिर-गुण-हीन
शून्य रसभिन्न !
काय गति तुझिया प्रेमाची ?
जय जय सान्तअनंतांची ॥ आरती० ॥ २

अंबिका लाभतांचि संगा !
प्रसवे खळखळ भवगंगा !
अनंगहि येई मग रंगा !
सूर्य झळझळति !
चंद्र लखलखति !
उडू लुकलुकति !
रम्यता भाजन प्रेमाची !
जय जय सांतअनंतांची ! ॥ आरती० ॥ ३
मंदिर नक्षत्रीं जडलें !
रवि, शशि झुंबर लोंबविले !
सीमा सौंदर्या न मिळे !
तूंच शशिसूर्य !
तूंच सौंदर्य !
मंदिरहि दिव्य !
रूपें लीला ही ज्याची !
जय जय सांतअनंतांची ! ॥ आरती० ॥ ४
नीलमणिरचित तबकिं गगनीं,
निरांजन रविशशि पाजळुनी,
ओंवाळिते सृष्टि रमणी !
झांझ झंझणण
वायु ! दंदणण
नगाराहि घन !
भास्कर भक्ति तुझी याची !
जय जय सांतअनंतांची ! ॥ आरती० ॥ ५

इंदूर, २९-११-२०

## कवितानुक्रमानुसार टीपा

१. तत्त्वज्ञान थोर खरें पण प्रणयही कमी थोर आहे का?

२. या कवितेंत दोन प्रणयी जीवांचा काव्यमय एकजीवीपणा व्यक्त केला आहे.

४. लोकमान्य कैलासवासी झाले हें ऐकून ही कविता लगेच लिहिली आहे.

५. सामाजिक कृत्रिम दडपणाखालीं सांपडलेलें विधवेचें मन येथें वर्णिलें आहे.

६. प्रणयहतास आपलें मन लपविणें सोपें नाहीं.

७. कवीची सर्व स्त्रीजातीबद्दलची अत्यंत उदार कल्पना यांत बिंबित होते आहे.

८. एक गोड दृश्य.

९. आपली परमात्म्याच्या प्राप्तीविषयींची तळमळ किती दुबळी आहे व त्याच्याच प्रसादावांचून प्राप्ति कशी होणें नाहीं हें या कवितेंत सूचित केलें आहे.

१०. ही साउली म्हणजेच अज्ञान.

११. मिळे पारखी इत्यादि—रा. मायदेवांस अनुलक्षून.

१२. एके दिवशीं पहांटेस उषेचा उज्ज्वल रक्तिमा पाहून परमात्म्यानें आपलेकडे अमृताचा घट भरून धाडला आहे असें कवीस वाटलें. अशीं किती वैभवें आपणच पहात नाहीं. व पाहिलीं तरी विसरतों.

१३. महाप्रस्थान म्हणजे जीवाचें जग सोडून निघणें. यावर ह्या कवींच्या एकंदर नऊ कविता आहेत. त्यांचा अनुक्रम पुढीलप्रमाणें घ्यावा. २४, १३, २६, २७, २५, २८, २९, ३०, ३१. ( २४ ) कवीचें मन शारीरिक अस्वास्थ्यानें दुर्बल झालें असतां घाबरून जातें व त्याची गांगरलेली स्थिति यांत बिंबित झाली आहे. कवि आपले जीवास डोळ्यांस अमंगळ पाणी न आणतां धीर धरण्यास सुचवीत आहे. ( १३ ) यांत मृत्यूची हांक कवीच्या कानीं आदळते व साहजिकपणें तो घाबरतो. ( २६ ) या कवितेंत कवि यमदूतांस आपली येण्याची तयारी असल्याचें सांगतो. निकड कोणाला ? जो तयार नसेल त्याला ना ? मी तर तयारच आहें असें कवि सांगतो. ( २७ ) या कवितेंत कवि मनाला सांगत आहे कीं, जगाचें अडेल या दृष्टीनें तूं मरणास तयार नसावें या तुझ्या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. जगाचें अडणार नाहीं इतकेंच नव्हे तर जगाला तुझी पर्वाही नाहीं. अशा बेपर्वा जगाचा मोह धरायचाच कशाला ? तेव्हां हरिदूतांस संमुख होणेंच योग्य असें कवि मनास सुचवीत आहे. ( २५ ) मरण म्हणजे जीवाचें त्याच्याशीं युद्धच. युद्ध करावयाचें तर वीरवृत्तीनें लढण्यांत हांशील; तेंच कवि सुचवितो. ( २८ ) जग सोडतांना जगानें केलेल्या उपकारांविषयीं कवीचें हृदय कृतज्ञतेनें भरून जात आहे. ( २९ ) कवीचें मनोधैर्य इतकें अढळ राहतें कीं मरण हें जीवनास आवश्यक आहे हेंही कटु सत्य तें सांगूं लागतें.

.( ३० ) शांतपणानें कवि जग सोडीत आहे. ( ३१ ) मरण म्हणजे गाडी बदलणेंच नव्हे का ?

१४. स्वरोत्कट माधुर्य तर आहेच पण स्वरांनीं प्रकट न झालेलें माधुर्य कितीतरी भरलें आहे. तें मूक असेल. पण तेंच शब्द-रस-रूपादिकांनीं प्रकट होतें. पण पुष्कळ वेळां मनुष्य हें विसरतो व त्याच्या इंद्रियांस शमविणाऱ्या पदार्थांतलें तेवढेंच माधुर्य तो मान्य करतो. परंतु अशानें तो केवढ्या माधुर्य-कुंभाला अंतरतो बरें ?

१५. आत्म्याचा विकास यांत ध्वनित केला आहे.

१६. आपल्या कृतीनें सुखी होणाऱ्या मित्रांस कृतज्ञतेनें व समानधर्मगुणानें कवि म्हणतो.

१८. असल्या कवितेस 'विराणी म्हणजे विरहिणी'चे उद्गार म्हणतात. अशा तऱ्हेचे तुकारामाचे कितीतरी अभंग आहेत.

१९. कवीचे सुखमय जीवनाची मीमांसा.

२१. जगांतील विषमता एकदांची नाहींशी व्हावी म्हणून रुद्रास कवि बोलवीत आहे.

२२. मधुरदयारस.. मुला. या कवीला स्वानुभवांत असे कितीतरी प्रसंग आले आहेत कीं, त्यांस वरीलप्रमाणें उद्गार काढणें अपरिहार्य आहे.

२३. जगावर प्रीति करण्याजोगीच परिस्थिति आहे असें कवीचा आशावाद स्पष्ट ध्वनित करीत आहे.

२४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१. —१३व्या कवितेवरील टीप पहा.

३२. उपयुक्ततावाद्यांवर उपरोधिकपणें ताशेरा.

३३. आयुष्य सुखमय करणारी सहचारिणी लाधल्यामुळें कवीस होणारा आनंद यांत ध्वनित झाला आहे.

३४. विरहस्थिति सृष्टीसही नापसंत म्हणून तिचें उग्र स्वरूप येथें दिसतें.

३५. परमात्माच जर घरीं चालून आला तर तो कोणत्या थाटांत येईल आणि त्याचें स्वागत तरी कसें करावयाचें ?

३६. नायिकेचें उत्कट औत्सुक्य यांत दिसतें.

३७. या कवितेंत त्रिभुवनजननीचें विश्वव्यापीप्रेम, कवीची कृतज्ञता व बालस्वभावानुसार पारितोष होतो आहे किंवा नाहीं हें पहाण्याची प्रवृत्ति उत्तम रीतीनें व्यक्त झाली आहे.

३८. किती आपण वेडे कीं बाह्यस्वरूपावरून अंतरंगाची कल्पना ठाम करतों.

३९. ध्येय आणि परिस्थिति या दोहोंनीं ओढल्या जाणाऱ्या जीवाची ओढाताण यांत दृष्टोत्पत्तीस येते.

४०. रजपूत वातावरण या अद्‌भुतरम्य प्रेमगीतांत व्यक्त होतें आहे. वधूस नेतांना रजपूत लोक घोडी वापरतात.

४१. त्याच वातावरणाचें पूरक चित्र.

४२. आपले वयांतील दिवस विसरलेल्या वडील माणसां-

करून रोग एक व निदान भलतेंच असें पुष्कळ वेळां होतें, त्याचाच हा नमुना.

४३. मूर्तापेक्षां अमूर्तांत मन जास्त रंगूं शकतें. प्रेमबद्ध जीवास तर हेंच विलास मानवतात.

४४. प्रेमगीत.

४५. द्वंद्वांमुळें या सुखाच्या बागेंत दुःखाचेंच तण सपाटून माजलेलें दिसतें. सौंदर्याच्या उपासनेसही किती मर्यादा आहेत! तेव्हां ही माया ईश्वरी अनुग्रहानेंच दूर झाली तर होईल. त्यासाठीं कवि प्रार्थना करीत आहे.

४६. प्रेमगीत.

४७. राजपुतान्यांत खेडेगांवांत असलीं गाणीं म्हणतात व फेर धरून नाचतात.

४८, ४९. परमात्म्याशीं मीलनोत्सुक आत्म्यास प्रश्न व त्याचें उत्तर.

५१. पूर्ण प्रेमांत तात्पर्य आहे हें सुचविलेलें आहे.

५५. एका निर्भय विरक्तास पाहून ही कविता सुचली आहे.

५६. भावी भारताचे उज्ज्वल स्वरूपाआड कोणीं न यावें म्हणून हा इषारा आहे.

५७. महात्म्याचे दर्शनानंतर ही कविता लिहिली आहे.

५८. स्वार्थत्यागी महात्म्याची अशीच प्रतिज्ञा असणार!

५९. कर्मानुसार फल.

६०. कवीचें पत्नीबद्दलचें निरसीम प्रेम यांत व्यक्त होत आहे.

६१. ललत राग ऐकून मन द्रवलें असतां एक पाहिलेलें दृश्य या कवितेंत गोंविलेलें आहे.

६४. 'आनंद'कर्त्यांचा मुलगा 'आनंद' वारला हें ऐकून लगेच ही कविता लिहिली आहे.

६६. यांतील वर्णन अवश्य पहावें.

६७,६८. हीं दोन्ही विधवांबद्दलचीं कवनें आहेत. एक हाल होत असून जीव न देतां मुलांसाठीं आत्मघातापासून परावृत्त होते. दुसरी विचार, भक्ति व निश्चयपूर्वक पुन्हां विवाहसूत्रानें बद्ध होते.

७२. कवीचा मूर्तिमंत आशावाद येथें व्यक्त होत आहे.

७३. या कवितेंत विश्वोत्पत्तीची मीमांसा केली आहे. सान्त अनंत म्हणजेच प्रकृति व पुरुष.

REFBK-0003449
REFBK-0003449
५४०